२५ वर्षे विश्वासार्हतेची

follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

❊ RNI Regd. No. 72105/99 ❊ वर्ष २५ ❊ अंक २३८ ❊ सातारा ❊ मंगळवार, दि. ७ मे २०२४ ❊ पाने ८ (सुप्रभात) ❊ किंमत ५/– रूपये



पराभव समोर दिसत असल्याने संविधान बदलण्याची भाषा

वृत्त पान ३ वर...

## थोडक्यात

### आयसीएसईच्या दहावी, बारावी परीक्षेचा निकाल जाहीर; महाराष्ट्र अव्वल

**मुंबई :** केंद्रीय मंडळाच्या आयसीएसई (दहावी) आणि आयएससी (बारावी) च्या परीक्षेचा निकाल सोमवारी सकाळी ११ वाजता जाहीर झाला आहे. विद्यार्थ्यांना https://cisce.org/ किंवा results.cisce.org या वेबसाइटवर जाऊन रिझल्ट चेक करता येणार आहे. रिझल्ट चेक करण्यासाठी युआयडी आणि इंडेक्स नंबरची नोंद करावी लागणार आहे. ICSE आणि ISC परीक्षा वर्ष २०२४ च्या निकाल जाहीर झाले आहेत. २,६९५ शाळांपैकी ८२.४८ टक्के शाळांमधील विद्यार्थी १०० टक्के उत्तीर्ण झाले आहेत. ¿ÊEE परीक्षांमध्ये मुलींनी बाजी मारली आहे. ९९.६५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. तर ९९.३१ टक्के मुलं उत्तीर्ण झाली आहेत. तर बारावीच्या परीक्षांमध्येही मुलींनीच बाजी मारली असून ९८.९२ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. तर, ९७.५३ टक्के मुलं उत्तीर्ण झाली आहेत. आयसीएसई किंवा आयएससी निकालांमध्ये महाराष्ट्र आणि गोवा या दोन्ही राज्यांचा निकाल खूप चांगला लागला आहे. या दोन्ही राज्यात ९९.७१ टक्के इतका निकाल लागला आहे.

### दाभोसा धबधब्यावर स्टंटबाजी, दोन तरुणांची उडी, एकाचा मृत्यू

**मुंबई :** पर्यटकांचा अतिउत्साहीपणा जीवावर बेतला आहे. जव्हार मधील प्रसिद्ध असलेल्या दाभोसा धबधब्यात १२० फुटांवरून दोन पर्यटकांनी उड्या मारल्या. त्यात एका पर्यटकाचा धबधब्यातील डोहात बुडुन मृत्यू झाला आहे तर, एक जण गंभीर जखमी झाला आहे. दोन्ही पर्यटक मिरा रोड आणि काशिमिरा परिसरातील असल्याची माहिती समोर येत आहे. माज शेख असं बुडून मृत्यू झालेल्या पर्यटकाचे नाव आहे. कर, जोएफ शेख असं गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. जखमी पर्यटकावर जव्हार येथील कुटीर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दोन्ही पर्यटकांचा १२० फुटांवरुन उडी मारतानाचा व्हिडिओ समोर आला आहे.

### कंगना बॉलीवूडला करणार रामराम!

**मुंबई :** देशभरात निवडणुकांची रणधुमाळी सुरु असताना बड्या बड्या नेत्यांचा जोरदार प्रचार सुरु आहे. अशातच भाजपाकडून उमेदवारी मिळालेली बॉलिवूडची क्विन कंगना रणौत हीदेखील हिमाचलमधील मंडीमधून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरली आहे. याच पार्श्वभूमीवर तिने जोरदार प्रचार सुरु केला आहे. प्रचारादरम्यान कंगनाने केलेल्या एका मोठ्या घोषणामुळे राजकीयसहित सिनेसृष्टीतील वर्तुळात चांगलीच चर्चा सुरु आहे. कंगनाने लोकसभा निवडणूक जिंकल्यास बॉलिवूड सोडणार असल्याची घोषणा केली. तिने बॉलिवूड सोडून पूर्णवेळ राजकारणाला वेळ देणार असल्याचं ठरवलं आहे. निवडणूक जिंकल्यास पुढे काय करणार, या प्रश्नावर कंगना म्हणाली की, 'मी सिनेमाच्या कामानेही कंटाळली आहे. मला राजकारणात यश मिळाल्यास, लोक सोबत राहतील, तर मी राजकारणच करेन.

# तिसऱ्या टप्प्यात आज मतदान


- ११ राज्यांतील ९३ जागांसाठी मतदान
- मध्यप्रदेशमध्ये मामा, महाराज, राजे यांची प्रतिष्ठा पणाला
- महाराष्ट्रात नणंद-भावजय रिंगणात

**नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात मंगळवारी (७ मे) १० राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील ९३ जागांसाठी मतदान होणार आहे. या टप्प्यात आधी १० राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये ९५ जागा होत्या, मात्र २१ एप्रिल रोजी सुरतमधून काँग्रेस उमेदवाराचा अर्ज रद्द झाल्यानंतर आणि ८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने भाजपचे मुकेश दलाल बिनविरोध निवडून आले आहेत. त्याचवेळी, जम्मू-काश्मीरमधील खराब हवामानामुळे अनंतनाग - राजौरी मतदारसंघाची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. आता येथे सहाव्या टप्प्यात २५ मे रोजी मतदान होणार आहे. याशिवाय मध्य प्रदेशातील बैतुल मतदारसंघातील बसपा उमेदवाराच्या मृत्यूनंतर दुसऱ्या टप्प्यात (२६ एप्रिल) होणारे मतदान ७ मे रोजी घेण्यात येणार आहे.**

मध्य प्रदेशातील तीन जागांचे भवितव्य - विदिशातून शिवराज सिंह चौहान (मामा), गुनातून ज्योतिरादित्य सिंधिया (महाराजा) आणि राजगढचे दिग्विजय सिंह (राजा) यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

याशिवाय महाराष्ट्रातील बारामती मतदारसंघात शरद पवार यांची कन्या





सुप्रिया सुळे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार म्हणजेच नणंद-भावजय यांच्यात थेट लढत आहे.

निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, तिसऱ्या टप्प्यात एकूण १३५२ उमेदवार रिंगणात आहेत. यापैकी १२२९ पुरुष आणि १२३ (९%) महिला आहेत.

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (अृठ) च्या अहवालानुसार, २४४ उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. ३९२ उमेदवारांकडे १ कोटी किंवा त्याहून अधिक संपत्ती आहे.

तिसऱ्या टप्प्यात ७ केंद्रीय मंत्री आणि ४ माजी मुख्यमंत्र्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. २४४ उमेदवारांवर गुन्हे, १७२ विरुद्ध खून, बलात्कार असे गुन्हे दाखल आहेत. ३८ उमेदवारांवर महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी दोघांवर बलात्काराचे गुन्हे दाखल आहेत. त्याचवेळी १७ उमेदवारांविरुद्ध द्वेषयुक्त भाषणाशी संबंधित गुन्हे दाखल आहेत.

तिसऱ्या टप्प्यातील १३५२ उमेदवारांपैकी ३९२ म्हणजेच २९% उमेदवार करोडपती आहेत. त्यांच्याकडे सरासरी ५.६६ कोटी रुपयांची मालमत्ता आहे. त्याच वेळी, पाच उमेदवार आहेत, ज्यांनी आपली मालमत्ता शून्य असल्याचे जाहीर केले आहे.

महाराष्ट्रातील कोल्हापूर मतदारसंघातील अपक्ष उमेदवार इरफान अबुतालिब चांद यांच्याकडे सर्वात कमी संपत्ती फक्त १०० रुपये आहे. त्याचवेळी, गुजरातमधील बारडोली मतदारसंघातील बहुजन समाज पक्ष उमेदवार रेखाबेन हरसिंगभाई चौधरी यांनी त्यांची संपत्ती २००० रुपये असल्याचे जाहीर केले आहे.

तिसऱ्या टप्प्यातील ६४७ (४८%) उमेदवारांवर कर्ज आहे. मध्य प्रदेशातील मुरैना मतदारसंघातील बसपाचे उमेदवार रमेश गर्ग यांच्यावर सर्वाधिक कर्ज आहे. आश्चर्याची बाब म्हणजे त्यांच्यावर ३५१.६१ कोटी रुपयांची कर्ज आहे, तर त्यांची एकूण मालमत्ता १६.४७ कोटी रुपये आहे.

सर्वाधिक वार्षिक उत्पन्नाच्या बाबतीत महाराष्ट्रातील माढा मतदारसंघातून भाजपचे रणजितसिंह हिंदुराव नाईक निंबाळकर आघाडीवर आहेत. त्यांचे एकूण वार्षिक उत्पन्न सुमारे ४४.५७ कोटी रुपये आहे. त्यांनी व्यापार आणि शेती हे त्यांचे उत्पन्नाचे साधन असल्याचे नमूद केले आहे.

एकूण १३५२ उमेदवारांपैकी ५९१ (४४%) उमेदवार पदवीधर आहेत, तर १९ उमेदवारांनी स्वतःला निरक्षर घोषित केले आहे. तर, ४११ (३०%) उमेदवारांचे वय २५ ते ४० वर्षांच्या दरम्यान आहे आणि २२८ (१७%) ६१ ते ८० वर्षांच्या दरम्यान आहेत, तर एका उमेदवाराचे वय ८४ वर्षे आहे.

गांधीनगर, गुजरात येथून देशाचे गृहमंत्री अमित शहा भाजपच्या वतीने येथून निवडणूक लढवत आहेत.

## कोरेगाव तालुक्यातील नऊ गावांचा मतदानावर बहिष्कार

### धोम धरणाचे पाणी रोखल्याने ग्रामस्थांमध्ये संताप





**सातारा/प्रतिनिधी**

राजकीय दबावातून धोम डाव्या कालव्याचे पाण्याचे आवर्तन अचानक थांबवण्यात आल्याने कोरेगाव तालुक्यातील नऊ गावांनी ७ मे रोजी होणाऱ्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे . कराड उत्तर मतदारसंघातील सुरली, जयपुर, पिंपरी, रहिमतपूर, अंभेरी, साप, कण्हेरखेड, बोरीव, अपशिंगे, वाठार या गावातील ग्रामस्थांनी हा निर्णय जाहीर केला असून याबाबतचे निवेदन जिल्हा प्रशासनाला मतदानाच्या पूर्वसंध्येला सादर करण्यात आले. या इशाऱ्यामुळे जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे

सातारा जिल्ह्यात मंगळवार दिनांक ७ मे रोजी जिल्ह्यातील अठरा लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे .जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी विविध संकल्पनेवर आधारित मतदान केंद्रांची निर्मिती केली आहे आणि मतदारांनी निर्भय वातावरणात मतदान करावे असे आवाहनही केले आहे . एकीकडे मतदानाच्या टक्केवारीसाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू असताना दुसरीकडे कोरेगाव तालुक्यातील नऊ गावांचा मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा खळबळ जनक ठरला आहे . धोम कालवा संघर्ष समितीचे प्रमुख नंदकुमार माने आणि सुमारे १०० ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन याबाबतचा निषेध व्यक्त केला आहे .जिल्हा प्रशासनाचे निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील (पान ५ वर)

## फडणवीसांकडून अभिजीत पाटलांना आमदारकीचे संकेत

**पंढरपूर :** माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचाराच्या निमित्ताने पंढरपूरमधील विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर रविवारी जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांच्याबाबत बोलताना सूचक विधान केले. देवेंद्र फडणवीस यांनी अभिजीत पाटील यांना थेट आमदारकीचे संकेत दिले आहेत. 'जे तुमच्या मनात तेच माझ्या मनात असून राजकारणही महत्वाचे आहे', असे फडणवीस या सभेत बोलताना अभिजीत पाटील यांना उद्देशून म्हणाले.



'काही लोकांनी सांगितले की, अभिजीत पाटील आपल्याला कारखाना महत्वाचा आहे. राजकारण महत्वाचं नाही. अभिजीत पाटीलही म्हणाले हो कारखाना महत्वाचा आहे. मात्र, मी सांगतो अभिजीत पाटील तुम्ही चिंता करु नका. राजकारणही तेवढंच महत्वाचं आहे. तुमच्या जे मानात आहे आणि यांच्या (जनतेच्या) जे मनात आहे, ते माझ्याही मनात आहे. त्यामुळे योग्य मार्गाने सर्व गोष्टी करू, काळजी करु नका'', असे सूचक भाष्य देवेंद्र फडणवीस यांनी केले.

''अभिजीत पाटील तुम्ही विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या परिवाराचे प्रमुख आहात. मात्र, या विठ्ठल परिवारामध्ये आता दत्तक म्हणून मी येत आहे. कारखान्यावरील ४०० कोटींचे कर्ज, त्या कर्जावर व्याज आणि पुन्हा व्याजावर व्याज असे तुम्ही कितीही मेहनत केली तर तुम्ही यातून बाहेर निघू शकत नाहीत. त्यामुळे याकरता वेगळं ऑपरेशन करावे लागेल. पुढच्या तीन ते चार महिन्यांमध्ये यावर आपण कायम स्वरुपी मार्ग काढू'', असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी अभिजित पाटील यांना दिले.

दरम्यान, विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर काही दिवसांपूर्वी शिखर बँकेने कारवाई केली होती. कारखान्याची तीन गोदामे सील करण्यात आली आहेत. विठ्ठल सहकारी कारखान्याने राज्य शिखर बँकेकडून कर्ज घेतले होते. त्या कर्जाची परतफेड न केल्यामुळे ही कारावाई (पान ५ वर)

## कुलरच्या विजेचा धक्का बसून चिमुकलीचा मृत्यू

**अकोला :** कुलरमधील विजेचा धक्का लागल्याने सात वर्षीय चिमुकलीचा करुण अंत झाल्याची दुर्दैवी घटना शहरातील शिवसेना वसाहतीमध्ये रविवारी सायंकाळी घडली. शिवसेना वसाहतीमधील रहिवासी माजी नगरसेवक अमोल गोगे यांची सात वर्षीय मुलगी युक्ती घरातील कुलरजवळ खेळत होती. कुलरला असलेल्या बटनांची एक वायर कटल्याने त्यामधील विजेचा प्रवाह पसरला होता. दरम्यान, युक्तीचा हात कुलरला लागला. यामुळे तिला विजेचा जबर धक्का बसला.

मुलीचा घटनास्थळीच मृत्यू झाला. युक्तीचे आई-वडिल व कुटुंबीय घरातच (पान ५ वर)

## उज्ज्वल निकमांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा!

### माजी आयपीएस शमशुद्दीन मुश्रीफांचा दावा

**मुंबई :** २६/११ हल्ल्यातील अनेक महत्त्वाच्या बाबींवर पडदा टाकण्याचे काम उज्वल निकम व आएसएस यांनी केल्याचा आरोप 'हु किल्ड करकरे' या पुस्तकाचे लेखक तथा माजी पोलिस अधिकारी शमशुद्दीन मुश्रीफ यांनी केला आहे. तर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी जे काही निकम यांच्यावर आरोप केलेत, ते अगदी सत्य असल्याचा दावा देखील त्यांनी केला. त्यामुळे उज्वल निकम



यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली. खटला सुरू झाल्यानंतर आरएसएस आणि उज्वल निकम या दोघांनी मिळून त्यावेळी शासन आणि कोर्टाची दिशाभूल केल्याचा आरोपही मुश्रीफ यांनी केला. ते माध्यमांशी बोलत होते.

मुंबईवर २६/११ दहशतवादी हल्ला होणार अशी माहिती अमेरिकेच्या गुप्तचर संघटनांनी आयबी (पान ५ वर)

## नाराज नसीम खान यांचा 'यू टर्न'; राजीनामा मागे

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने उमेदवारी न दिल्यानं नाराज झालेले अल्पसंख्यांक नेते नसिम खान यांची नाराजी दूर करण्यात अखेर काँग्रेसला यश आलं. उत्तर मध्य मुंबईतून नसिम खान यांना उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र काँग्रेसने या जागेवर वर्षा गायकवाड यांना तिकिट दिलं. यानंतर नसिम खान यांनी उघडपणे नाराजी व्यक्त करत स्टार प्रचारक पदाचा राजीनामा दिला होता. आता नसिम खान यांनी राजीनामा मागे घेतला आहे. आता आपण वर्षा गायकवाड यांचा प्रचार करणार असल्याचे त्यांनी सांगितलेय.

आयत्यावेळी नसिम खान डावलून वर्षा गायकवाड यांना उमेदवारी मिळाल्याने नसिम खान नाराज होते. त्यामुळे नाराज होऊन त्यांनी राजीनामा दिला होता. त्यात यावेळी काँग्रेसने महाराष्ट्रातील एकाही मुस्लीम व्यक्तीला उमेदवारी दिली नाही. त्यामुळे ही कॅग्रेसने नाराजी ओढावून घेतली होती. आता मात्र (पान ५ वर)

## मुंबईतील नाका कामगारांच्या घामाचा कुटुंबासह सन्मान

**मुंबई / रमेश औताडे**

प्रभात ट्रस्ट डोळ्यांचा फिरत्या दवाखान्यातून मोफत डोळे तपासणी, चष्मा, औषधे व कडधान्य वितरण, वार्षिक आरोग्य तपासणी अशा विविध उपक्रमातून नाका कामगार प्रभात कुटुंबाचा एक घटक झाले आहे. यासाठी नाका कामगारांसाठी सन्मान कष्टाचा अर्थात नाका कामगारांच्या घामाचा सन्मान व त्यांच्या कुटुंबाचा मेळावा रविवार ५ मे रोजी नवी मुंबई, घणसोली येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात कामगारांच्या





जीवनावरती आधारित कवितांचा कार्यक्रम आयोजन करण्यात आला होता. कविता डॉट कॉमचे प्रा.रवींद्र पाटील सर, कवी जितेंद्र लाड यांच्या जोडीला बालकवी प्रसाद माळी, दक्षता लाड, अंकिता गोळे यांनी कामगारांच्या हृदयाला साथ घालणाऱ्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी शंकर गोपाळे यांनी केले.

श्रमाला मोल मिळो.. घामाला दाम मिळोया हातांना काम मिळो.. अन् कामाला सन्मान मिळो.. या आशयाची 'मी नाका कामगार' ही कविता कामगारांनी सादर केली. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या मनोरंजनात्मक खेळासाठी नाका कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

अन्वय प्रतिष्ठानच्या माध्यमातून प्रा. अजित मगदूम यांनी व्यसनमुक्तीसाठी नाका कामगारांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी होते. त्यांच्या हस्ते लकी ड्रॉ चे वितरण करण्यात आले. लकी ड्रॉ मध्ये पहिल्या क्रमांकाला विजेत्या ठरणाऱ्या कल्लू खान यांना सायकल प्रदान करण्यात आली.अशी माहिती प्रभात ट्रस्ट चे अध्यक्ष डॉ. प्रशांत भास्करराव थोरात यांनी दिली.

## देशात तूरडाळ व तांदळाच्या दरवाढीनंतर आता साखरही कडवटणार!

**नागपूर :** निवडणुकांची रणधुमाळी तसेच कडाक्याच्या उन्हाळ्यात कोल्ड्रिंक्स आणि आईस्क्रीमची मोठ्या प्रमाणात मागणी होते. त्यामुळे देशभरात सध्या साखरेची प्रचंड मागणी आहे. मात्र केंद्र सरकारने निवडणुका लक्षात घेता मे महिन्यात साखरेच्या कोट्यात भरघोस वाढ केलेली आहे. यामुळे ग्राहकांना आता घरातील डाळ-धान्यासह साखरेच्या महागाईच्या झळा सहन कराव्या लागणार आहेत. साखरेच्या दरवाढीने किचनमधील गोडवा कमी केला असल्यामुळे सामान्यांना गोडधोड करुन तोंड गोड करणेही



आता परवडणार नाही. त्यांना साखरेसाठी अधिक खर्च करावा लागणार आहे.

सरकारने निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दरवाढीस आळा बसावा म्हणूनच हा निर्णय घेतला असून त्याला 'इलेक्शन कोटा' असे म्हटले जाते. केंद्र सरकार प्रत्येक महिन्याला साखरेचा कोटा जाहीर करीत असते. मे महिन्याचा कोटा केंद्राकडून जाहीर केला असून तो कोटा मुबलक असल्याने साखरेच्या दरात प्रतिकिलो एक ते दोन रुपयांची घसरण अपेक्षित होती. मात्र सरकार निवडणुकांमध्ये व्यस्त असल्याने त्यांच्या त्या मनसुब्याला धक्का बसला आहे.

विशेषत: मागील महिन्यात साखरेचा कोटा मागणीच्या तुलनेत कमी असल्याने प्रतिकिलो दोन ते अडीच रुपये भाव वाढले होते. इलेक्शन कोट्यानुसार या दरात उतार होण्याऐवजी साखरेचे भाव प्रतिकिलो एक रुपयांनी वाढले आहे. तर लवकरच साखरेच्या दरात सरासरी दोन रुपयांची वाढ होईल अशी चर्चा व्यापारीवर्गात आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी पाहता केंद्र सरकारने तब्बल २७ लाख टन साखर खुली केली. कोटा जाहीर होताच भाव कमी होण्याची शक्यता होती. मात्र, त्यात वाढ झाल्याने व्यापाऱ्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला आहे. कोटा आणि मागणी लक्षात घेता साखरेच्या बाजारात साठेबाज सक्रिय झाल्याची चर्चा आहे. तसेच अजूनही प्रतिकिलो दोन रुपयांची वाढ होण्याची शंका वर्तवण्यात येत आहे.

## ठाकरेंच्या कार्यकर्त्यांना गुजराती रहिवाशांकडून प्रवेशबंदी

- गिरगावनंतर घाटकोपरमध्ये घडला प्रकार

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीसाठी सध्या राजकीय पक्षांचा जोरदार प्रचार सुरु आहे. निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान मंगळवारी पार पडत आहे. तर शेवटच्या टप्प्यात मुंबई आणि पुण्यात मतदान पार पडणार आहे. त्यामुळे शेवटपर्यंत मुंबईत प्रचाराची हवा जोरदार वाहणार आहे. राजकीय पक्षांचे अनेक कार्यकर्ते उन्हातान्हात रॅली काढताना दिसतायत. मात्र, आणखी ताकद लावून प्रचार सुरु होण्यापूर्वीच एक मोठी घडामोड मुंबईत घडली आहे, ज्यामुळे निवडणुकीपूर्वी मुंबईत मराठी विरुद्ध गुजराती वाद चिघळण्याची शक्यता आहे.

ईशान्य मुंबईतील एका गुजराती रहिवाशांच्या सोसायटीमध्ये ठाकरे गटाच्या पदाधिकार्यांना प्रवेश नाकारण्यात आला. ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघात गुजराती मतदारांची संख्या लक्षणीय आहे. काल संध्याकाळी ठाकरे गटाचे शिवसैनिक घाटकोपर पश्चिम परिसरात निवडणुकीचा प्रचार करत होते. या भागात असणाऱ्या समर्पण सोसायटीमध्ये ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांना प्रवेश नाकारण्यात आला. त्यामुळे ऐन मतदानापूर्वी मुंबईत मराठी विरुद्ध गुजराती वाद रंगण्याची चिन्हं दिसत आहेत.

समर्पण सोसायटीत गुजराती रहिवाशांची संख्या जास्त आहे. त्यांच्याकडून ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांना सोसायटीच्या आवारात येण्यापासून मज्जाव करण्यात आला. तुम्हाला सोसायटीत प्रचार करता येणार नाही, असे सोसायटीच्या लोकांकडून सांगण्यात आले. त्यामुळे आता मुंबईत मराठी विरुद्ध गुजराती हा वाद तापण्याची शक्यता आहे. चौथ्या टप्प्याचे मतदान संपून मुंबईत जेव्हा शेवटच्या टप्प्यातील प्रचार सुरु होईल तेव्हा या मुद्द्यावरुन वातावरण आणखी चिघळण्याची शक्यता आहे.

# पाणीटंचाईमुळे ग्रामस्थांच्या घशाला कोरड

पश्चिम वऱ्हाडातील अकोला, बुलढाणा व वाशिम या तीनही जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये उपलब्ध असलेल्या जलसाठ्यांवर संपूर्ण उन्हाळा निघणे अवघड आहे. त्यामुळे माणुसकी धर्माला जागत प्रत्येकानेच पाणी जपून वापरण्याबाबत स्वत:हून काळजी घेणे गरजेचे आहे.-

मतमोजणी व निकाल बाकी असला तरी, निवडणुकीची धामधूम संपल्याचा उसासा यंत्रणांकडून टाकला जातो न जातो, तोच पाणीटंचाईच्या समस्येने घशाला कोरड पडली आहे. राजकारणातील जय पराजय होत राहतील, त्या संबंधातील आकडेमोडीत अडकून न राहता यंत्रणांनी तातडीने याकडे लक्ष पुरविणे आत्यंतिक गरजेचे बनले आहे. विदर्भातील मतदान पहिल्या दोन चरणात झाल्याने निवडणुकीची धामधूम तशी आटोपली आहे, आता निकाल काय यायचा तो ४ जूनला येईल व त्यातून कोणाला काय फटका बसायचा तो तेव्हा कळेलच. परंतु, तोपर्यंत उन्हाचा जो चटका अंग भाजून काढणारा ठरत आहे आणि त्यातून पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस तीव्र बनत चालली आहे त्यातून मार्ग काढला जाणे अपेक्षित आहे. लोकसभा निवडणूक निकालाच्या आकडेमोडीतून बाजूला होत आमदार तसेच जिल्हा परिषदेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांनीही यासंदर्भातील उपाययोजनांबाबत पाठपुरावा



करणे गरजेचे आहे.निवडणुकीच्या रंगात सारेच असे काही रंगून गेले आहेत, की त्यातून पाणीटंचाईच्या समस्येकडे काहीसे दुर्लक्षच होताना दिसत आहे. अकोला जिल्ह्यात मोठे, मध्यम व लघू असे मिळून एकूण ३० प्रकल्प असून, त्यात अवघा २७ टक्के जलसाठा उपलब्ध आहे, तर वाशिम जिल्ह्यातील सर्वाधिक ७७ प्रकल्पांमध्येही सुमारे तितकाच म्हणजे २८.७०% जलसाठा आहे. बुलढाणा जिल्ह्यात तर यापेक्षा बिकट अवस्था असून, तेथील ४७ प्रकल्पांमध्ये अवघा १७ टक्केच जलसाठा आहे. खडकपूर्णा प्रकल्प आताच कोरडा पडला आहे. निसर्गाचे बदलते वेळापत्रक बघता जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस होईलच याची शाश्वती देता येऊ नये, तेव्हा संपूर्ण मे महिना व जूनचे काही दिवस या साठ्यावर काढायचे तर खूप अवघड होणार आहे. बरे, उन्हाचा कडाका असा आहे की बाष्पीभवनाचा वेगही वाढून गेला आहे; त्यामुळे या जलसाठ्याचे नियोजन केले तरी पाऊस येईपर्यंत ते टिकणे मुश्किलीचे आहे.ग्रामीण भागातून आताच ओरड होऊ लागली आहे. बुलढाणा जिल्ह्यात तर टँकर्सही सुरू झाले आहेत. हे संकट हाताळणे वाटते तसे सोपे नाही, कारण काही ठिकाणी प्रकल्प उशाला असूनही केवळ पाणी वहन यंत्रणा सक्षम नसल्याने ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

माता भगिनींना दोन दोन, चार चार किलोमीटर अंतरावरून झिरप्यामधून दूषित पाण्याचे हंडे घेऊन गरज भागवावी लागत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात यासंबंधीची ओरड अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. लोकसभेचा मांडव उठून गेला, पण ज्यांना विधानसभेच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मांडवाखालून जायचे आहे त्यांच्यासाठी ही बाब अडचणीचीच ठरू शकेल.महत्त्वाचे म्हणजे, एकीकडे ग्रामीण भागातील माता भगिनींचे पाण्यावाचून हाल होत असताना दुसरीकडे विशेषत: शहरी भागात सायंकाळी उकाड्यापासून सुटका मिळून निवांत झोप लागावी म्हणून अंगणात पाणी मारले जात असल्याचेही दिसून येते.

काही वाहनचालक छानपैकी नळी लावून वाहने धुताना दिसून येतात. या अशांना स्वत:ला पाण्याचे मोल कळणार नसेल, तर महापालिकेच्या यंत्रणांनी तरी त्यांचे कान धरायला हवेत; परंतु पाण्याची नासधूस करणाऱ्यांवर कसलीही कारवाई केली गेल्याचे अद्याप तरी ऐकिवात नाही.जिल्हा प्रशासनातर्फे संभाव्य पाणीटंचाईच्या निवारणार्थ ज्या काही उपाययोजनांचे नियोजन केले गेले होते, त्याचे काय झाले याबाबतचा आढावा तत्काळ घेतला जायला हवा. पालकमंत्री व शासनाला भलेही यासाठी वेळ मिळो न मिळो, प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष द्यायला हवे, कारण स्थानिक पातळीवर जनतेला त्यांना तोंड द्यायचे आहे.

निवडणुकीच्या धामधुमीत जो अवकाळीचा तडाखा बसून गेला त्याचे पंचनामे आता मतदान संपल्यानंतर सुरू झाले आहेत. त्याचसोबत पाणीटंचाईची ओरड वाढण्यापूर्वीच त्यासंबंधीच्या उपाययोजना करणे अपेक्षित आहे. सारांशात, यंदा पाणीटंचाईची झळ मोठ्या प्रमाणात बसण्याची चिन्हे असल्याने राष्ट्रीय संसाधनाच्या जपणुकीच्या अंगाने व माणुसकीच्या दृष्टीने पाणीटंचाईच्या या समस्येकडे सर्वांनी बघायला हवे, परंतु तेच होताना दिसत नाही. यंत्रणांनीही निवडणूक संपली म्हणून ''रिलॅक्स'' न राहता जनता जनार्दनाचा घसा कोरडा पडणार नाही याची खबरदारी घेणे गरजेचे आहे.

# पंतप्रधान मोदींच्या सहकार्यामुळेचं शरद पवारांचे..

## राधाकृष्ण विखेंचं मोठं विधान!

.' ;भाजपचे स्टार प्रचारक तथा नगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेपूर्वी शरद पवारांविषयी जुना आणि गंभीर विषय आठवणीत आणून ताजा केला.

'दाऊदच्या हस्तकांना तुम्ही विमानातून घेवून आलात हे देशाची जनता अजून विसरलेली नाही', असे म्हणत विखेंनी जुन्या जखमेवरील खपली काढली. त्यामुळे मंगळवारची पंतप्रधान मोदी यांची सभा वादळी होणार, अशी चिन्हे दिसू लागली आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी

यांची मंगळवारी नगर शहरात सभा होत आहे. या सभेच्या तयारीचा आढावा मंत्री विखे यांनी घेतला. भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. केंद्रातही त्यांना मंत्रीपद मिळाले. बारामतीच्या बाहेर जावून त्यांनी काय केले? नगर जिल्ह्यात आलेले उद्योग ही पवारांची मेहेरबानी नाही. आम्ही काय केले, यापेक्षा दाऊदच्या हस्तकांना तुम्ही विमानातून घेवून आलात हे देशाची जनता अजून विसरलेली नाही. शरद पवारांनी नरेंद्र मोदी यांच्यावर बोलावे हेच मुळात दुर्दैव आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहकार्यामुळेच शरद पवारांचे राजकीय अस्तित्व टिकून आहे.

विखेंनी काय केले हे शरद पवारांना सांगण्याची गरज नाही. या जिल्ह्यातून आठ वेळा लोकनेते बाळासाहेब विखे यांना संसदेत प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. मलाही सात वेळा जनतेने निवडून दिले. ही आमच्या कामाची पावती आहे. शरद पवार यांचे नगर जिल्ह्यासाठी काय योगदान आहे, हे त्यांनी एकदा सांगावे, असेही मंत्री विखे यांनी म्हटले.शदर पवार यांचे कर्तृत्व काय हे राज्यातील आणि देशातील जनतेने पाहिले आहे. बारामतीच्या बाहेर ते काहीही करु शकलेले नाहीत. केवळ संस्था बळकावण्याचे काम त्यांनी केले. रयत शिक्षण संस्था ताब्यात घेवून त्याचा राजकीय अड्डा कसा केला, याची टीका मंत्री विखे

यांनी केली. **Nashik Constituency** : ...अन् शेवटच्या क्षणी भाजपच्या अनिल जाधवांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी करायला लावली धावाधाव!बाळासाहेब थोरात वैफल्यग्रस्त -माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यावरही मंत्री विखे यांनी निशाणा साधला. 'थोरात वैफल्यग्रस्त झाले असून, त्यांच्या बोलण्याला आता कुठलाही आधार राहिलेला नाही.

डॉ. सुजय विखे यांनी पाच वर्षात केलेल्या कामांची चित्रफीत मी थोरात यांना पाठविणार असून, थोरातही अनेक वर्षे राज्याच्या मंत्रिमंडळात होते. नगरसाठी त्यांचे योगदान काय? मंत्री पदाच्या माध्यमातून तुम्ही जिल्ह्याला कसा फायदा करुन दिला, हे एकदा तरी सांगा. नाहीतर मी तरी महसूल मंत्रीपदाच्या माध्यमातून जिल्ह्यासाठी कोणते निर्णय केले हे सांगायला तयार आहे', असे मंत्री विखे यांनी थोरात यांना आव्हान दिले. पूर्वीप्रमाणे बदल्यांचे रेटकार्ड आमच्याकडे नाही.

भारतीय जनता पक्षामध्ये येण्याची तुमची तयारी झाली होती. तुमच्यासाठी कोणता आमदार मध्यस्थी करत होता, हे मला माहित आहे. तुमच्या भ्रष्ट कारभारामुळे दिल्लीतून कसा नकार मिळाला. याचे शल्य आता थोरात यांना असल्याचा टोला मंत्री विखे यांनी लगावला.

# धनंजय मुंडेंचा बजरंग सोनवणेंवर आरोप

**बीड** : तुतारीवाल्याकडून बीड जिल्ह्याचा विकास होणार नाही. ते केवळ मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा गैरफायदा घेत आहेत. आंदोलनात कवडीचेही योगदान नसणाऱ्या बजरंग सोनवणेंनी प्रमाणपत्राचा वापर खरेदी-विक्री संघाच्या निवडणुकीत ओबीसी उमेदवार म्हणून फॉर्म भरण्यासाठी केला. म्हणजे निवडणूक लढवायला ओबीसी अन् इकडे मात्र मराठा समाजाची मते मागतात.' असा आरोप पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यावर केला.

सुज्ञ मतदार असल्या जातीपातीच्या राजकारणाला बळी पडणार नाहीत, असा विश्वासही यावेळी धनंजय मुंडेंनी व्यक्त केला. माजलगाव येथे जय महेश कारखान्यावर कर्मचार्यांशी धनंजय मुंडेंनी संवाद साधला. कारखान्याचे बालू जाधव, कार्यकारी संचालक प्रसाद बाबू, पुरूषोत्तम, लक्ष्मण



पौळ, राजाभाऊ पौळ यांची उपस्थिती होती.

धनंजय मुंडे म्हणाले, 'आपल्याला जातीपातीच्या पलिकडे जाऊन विकासाची ब्ल्यू प्रिंट पाहावी लागेल. इथली माती सुपिक आहे. परंतु इथे शेतीसाठी पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे येणार्या काळात कोकणातून समुद्रात वाहून जाणारे पाणी आपल्याला नाशिकच्या धरणात आणायचे आहे. तिथून ते जायकवाडी धरणात तिथून ते माजलगाव धरणात अन् पुढे परळीच्या तांदळवाडी येथे नव्याने होणार्या तलावात नेण्यात येणार आहे.'या प्रकल्पामुळे सुमारे ४२ टीएमसी पाणी जिल्ह्याला मिळणार आहे. हा प्रकल्प पुर्णत्वाला गेला तर जिल्ह्याची ८ लाख हेक्टर जिरायती शेतीपैकी ७ लाख हेक्टर शेती बागायती होणार आहे. त्यासाठी केंद्रात आणि राज्यात एकाच विचाराचे सरकार हवे. अन् जिल्ह्याचा खासदार देखील त्याच विचाराचा असायला हवा, आपल्या तुतारीवाल्या उमेदवाराला जिल्ह्याची भौगोलिक स्थिती तरी माहिती आहे का? असे देखील मुंडे म्हणाले.

याचबरोबर 'आपल्या शेजारच्या लातुरला रेल्वे कोच बनवण्याची फॅक्ट्री मंजूर झाली. तिचे काम देखील युध्द पातळीवर सुरू आहे. त्यातून हजारो तरुणांना रोजगार मिळणार आहे. तसाच एखादा मोठा रोजगार आपल्या जिल्ह्यात आणण्यासाठी पंकजा मुंडे केंद्रात प्रयत्न करतील आणि तसा मोठा प्रकल्प मोदीच जिल्ह्याला देवू शकतात.' असेही धनंजय मुंडे म्हणाले. गेल्या अनेक वर्षापासून आपण रेल्वेने येणार म्हणत आहोत. सध्या ही रेल्वे पाटोदा तालुक्यातील अंमळनेरपर्यंत आलेली आहे. पुढच्या वर्षभरात ती परळीपर्यंत येईल. आपल्याला नुसती रेल्वे पाहीजे नाही, तर वंदे भारत एक्सप्रेस बीड येथून बंगळुरू, हैद्राबाद, मुंबईला धावायला हवी, यासाठी प्रयत्न करायचे आहेत.', असे देखील मुंडे म्हणाले. आपल्याला विकासाचे राजकारण करावे लागेल. जात, पात, धर्म यामध्ये कोणाचेही भले होणार नाही. तुतारीने जिल्ह्याचा विकास अजिबात होणार नाही. कोणाच्याही भुलथापांना विनाकारण बळी पडू नका, असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी केले.

# 'आनंद दिघेंचा मृत्यू झाला त्यावेळी' जितेंद्र आव्हाडांचं विधान

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या ठाण्यात राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. या ठिकाणी खरंतर दोन शिवसैनिकांमध्ये लढत होत आहे. महायुतीने एकनाथ शिंदेच्या शिवसेनेचे नरेश म्हस्के यांना रिंगणात उतरवले आहे. तर त्यांच्याविरोधात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे विद्यमान खासदार राजन विचारे हे आहेत.

दरम्यान, नरेश म्हस्केंच्या प्रचारावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राजन विचारेंबाबत केलेल्या वक्तव्यावर राजन विचारेंकडूनही जोरदार प्रत्युत्तर दिलं गेलं आहे. शिवाय ठाणेकरांचा भावनिक मुद्दा असलेल्या आनंद दिघेंवरूनही जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. राजन विचारे आनंद दिघे यांचे नकली शिष्य, तर नरेश म्हस्के असली शिष्य आहेत. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडणाऱ्यांबरोबर राजन विचारे गेले आहेत. आनंद



दिघे यांना उद्धव ठाकरे यांनी कायम त्रास दिला, असा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

मुख्यमंत्री शिंदे म्हणतात, राजन विचारे नकली, तर नरेश म्हस्के आनंद दिघेंचे असली शिष्य या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे ठाण्यातील नेते शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही यामध्ये उडी घेत, आनंद दिघे यांच्या मृत्यूनंतर काय काय घडामोडी घडल्या हे सांगितले आहे. एका वृत्तवाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार आव्हाड म्हणाले, ''मला मिलिंद नार्वेकरांचा फोन आला होता, उद्धव ठाकरेंनी तुम्हाला बोलावलं आहे, आनंदचा मृत्यू झालेला आहे.

कोणाला काहीच माहीत नव्हतं, मी शरद पवारांना सांगितलं. मला विचारलं गेलं साधारण लोक किती आहेत, तत्काळ गाडीत बस अन् निघ तिथून आणि त्यानंतर लगेच दंगल सुरू झाली. त्यामुळे खोटेपणाला मर्यादा असते, एखाद्याच्या नावाने सहानुभूती मिळवायची ते किती याचं वास्तव जाणणारी लोक आहेत.''

शिंदेंची टीका झोंबली; राजन विचारे भडकले, म्हणाले, ' मला तोंड उघडायला लावू नका...'याचबरोबर आव्हाड म्हणाले, आनंद दिघे यांचा मृत्यू झाला तेव्हा हॉस्पिटलमध्ये कोण कोण होतं, मला नाव घ्यायला भाग पाडू नका. तेव्हा मी स्वत: तिथे हजर होतो. मुख्यमंत्र्यांनी राष्ट्रीय पातळीवर बोलावं, गल्लीबोळात बोलू नये. मणिपूर प्रकरण, ब्रृजभूषण, चीन, जाहीरनाना यावर बोला. तेच तेच आनंद दिघे यांचा मुद्दा काढला जातो. आता नवीन पिढी आहे.

# ...तेव्हा बाळासाहेब थोरात यांनी भाजपामध्ये येण्याची प्रक्रिया सुरू केली होती

## राधाकृष्ण विखेंचा दावा

**अहमदनगर** : वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी विखे पिता -पुत्र काँग्रेसच्या संपर्कात असल्याचे सूतोवाच केले. त्यांच्या या वक्तव्यावरून राजकीय खळबळ उडाली असून विखे व थोरात यांच्यामध्ये चांगलाच कलगीतुरा रंगला आहे.बाळासाहेब थोरातयांची भाजपमध्ये येण्याची प्रक्रिया विधान परिषद निवडणुकीच्या वेळी सुरू झाली होती. त्यांची कुणासोबत बैठक झाली. हे आपल्याला माहिती आहे. त्यांची भाजप प्रवेशाची प्रक्रिया का थांबली याचा खुलासा देखील त्यांनी करावा असे आव्हान मंत्री विखे यांनी थोरात यांना केले आहे.

वंचितचे नेते आंबेडकर यांच्या वक्तव्याबाबत माध्यमांशी बोलताना माजी मंत्रीबाळासाहेब थोरातम्हणाले, विखे यांची काँग्रेसमध्ये येण्यासाठीची धडपड सुरू आहे. हे माझ्याही कानावर आले आहे. त्याचं कारण असं आहे की त्यांना सत्ता कुणाची येणार आहे, हे सर्वांपेक्षा लवकर



कळते.

थोरात यांच्या या टीकेला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटीलयांनीही प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले, सध्या लोकसभा च्या निवडणुका सुरू आहेत. देशातील कोणत्याही मुद्द्यावर ते बोलायला तयार नाहीत. त्यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. त्यांची भाजपमध्ये येण्याची प्रक्रिया विधान परिषद निवडणुकीच्या वेळी सुरू झाली होती. त्यांची कुणासोबत बैठक झाली. हे आपल्याला माहिती आहे. त्यांची भाजप प्रवेशाची प्रक्रिया का थांबली याचा खुलासा देखील त्यांनी करावा असे आव्हान मंत्री विखे यांनी थोरात यांना केले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार खेडकर यांच्या प्रचारार्थ ज्येष्ठ नेते प्रकाश आंबेडकर यांची शनिवारी नगरमध्ये सभा झाली. त्यावेळी त्यांनी विखे यांच्यावर तोफ डागली. त्यांनी महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील व त्यांचे वडील महसूल मंत्रीराधाकृष्ण विखे पाटीलहे काँग्रेसच्या संपर्कात आहेत,असा गोप्यस्फोट केला. त्यावरून थोरात व विखे यांच्यात चांगलाच कलगीतुरा रंगला आहे. या संदर्भात माध्यमांशी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी विखे यांची काँग्रेसमध्ये येण्याची धडपड सुरू असल्याची कुणकुण आपल्या कानावर आली आहे, असे सांगितले, तर दुसरीकडे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही थोरात यांची भाजपमध्ये येण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. ती का थांबली याचा खुलासा त्यांनी करावा, अशी टीका केली आहे.

# कोल्हापूर, हातकणंगलेत शक्तिप्रदर्शनाने प्रचाराची सांगता

## अखेरच्या दिवशीही मुख्यमंत्री शिंदे यांच्या जोडण्या सुरूच

**कोल्हापूर** : लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची सांगता कोल्हापूर जिल्ह्यात रविवारी जोरदार शक्तिप्रदर्शनाने झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे संजय मंडलिक व धैर्यशील माने या दोन्ही उमेदवाराच्या प्रचार रॅलीत सहभागी झाले होते. हातकणंगले मतदारसंघातील सतेज पाटील सरूडकर, राजू शेट्टी यांच्यासह सर्व उमेदवारांनी इचलकरंजी शहराला प्रचाराचा केंद्रबिंदू बनवले होते. आता छुप्या प्रचाराला सुरुवात झाली आहे.

आज प्रचाराचा अखेरचा दिवस असल्याने सुपर संडेची संधी साधून सकाळपासूनच वातावरण ढवळून निघाले होते. कोल्हापुरात संजय मंडलिक यांच्या प्रचाराच्या सांगता रॅलीत मुख्यमंत्री शिंदे सहभागी झाले होते. मी कोल्हापुरात तळ ठोकून राहिल्याने संजय मंडलिक, धैर्यशील माने हे दोघेही विजयी होतील. माझ्या उपस्थित राहण्याने विरोधकांच्या पोटात गोळा का आला आहे, असा प्रतिप्रश्न शिंदे यांनी केला.

दरम्यान शाहू महाराज यांच्या प्रचारासाठी स्थानिक पातळीवर गाठीभेटी, वैयक्तिक संपर्क यावर भर देण्यात आला. काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवार यांनी अखेरच्या दिवशी कोल्हापुरात उपस्थित राहून प्रचार यंत्रणा अखेरच्या टप्प्यामध्ये गतिमान करण्यावर भर दिला.

उन्हात इचलकरंजी तापली

भर उन्हातही इचलकरंजी शहरात प्रचाराचा धडाका उडाला होता. मुख्यमंत्री शिंदे इचलकरंजी खासदार माने यांच्या प्रचार रॅलीत सहभागी झाले होते. शिवाजी महाराज पुतळ्यापासून निघालेल्या दुचाकी रॅलीला चांगला प्रतिसाद मिळाला. ठाकरे सेनेचे सत्यजित पाटील सरूडकर यांच्या मिरवणुकीत महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनीही जोरदार शक्तिप्रदर्शन करीत प्रचाराची सांगता केली.

# विजय वडेट्टीवार यांच्याविरोधात भाजपा विधी सेलकडून सिताबर्डी पोलीस ठाण्यात तक्रार

**नागपूर** : काँग्रेसचे नेतेविजय वडेट्टीवारयांनी शहीद आयपीएस अधिकारी हेमंत करकरे यांच्यासंदर्भात केलेल्या वक्तव्यावरून भाजपच्या विधी सेलच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्याविरोधात पोलीस तक्रार केली आहे. सिताबर्डी पोलीस ठाण्यात ही तक्रार करण्यात आली.

भाजपच्या विधी सेलचे महानगर अध्यक्ष ड.परीक्षित गजानन मोहिते यांनी ही तक्रार केली. तक्रारीनुसार वडेट्टीवार यांनी करकरे यांच्या मृत्यूमागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपचा हात असल्याचा आरोप केला होता. भाजप व भाजपचे उमेदवार उज्वल निकम देशद्रोही असल्याचा आरोपदेखील वडेट्टीवार यांनी केला. वडेट्टीवार यांनी असे वक्तव्य करून आचारसंहितेचा भंग केला असून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.विजय वडेट्टीवारयांचे वक्तव्य तथ्यहीन असून न्यायालयाचादेखी अवमान करणारे आहे अशी भूमिका भाजपकडून घेण्यात आली. वडेट्टीवार यांनी केलेले आरोपी राजकीयदृष्ट्या प्रेरित असून पोलीस यंत्रणेच्या कर्तृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आहेत. त्यामुळे त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी विधी सेलतर्फे तक्रारीतून करण्यात आली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# ड्रग्ज माफिया आणि गुन्हेगारी मुक्त शहर करायचे आहे

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा भाजपवर हल्लाबोल




**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्र असलेल्या पुणे शहराला ड्रग्ज माफिया आणि गुन्हेगारीने विळखा घातला आहे. पुणे शहराला यामधून मुक्त करायचे आहे. त्यामुळेच पुण्यातून जुमलेबाज सरकारला दुर करायचे असल्याचे विधासनसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी आशिष दुआ, गुजरात काँग्रेसच्या प्रवक्त्या प्रगती आहिर, सहप्रभारी दादू खान,माजी आमदार मोहन जोशी प्रवक्ते गोपाळ तिवारी, अजित दरेकर, प्रकाश सोनावणे उपस्थित होते.

वडेट्टीवार म्हणाले, देशभरामध्ये बदलाचे वारे आहेत. त्यामुळे पुणे शहरामध्ये सुध्दा काँग्रेस पक्षाचा उमेदवार १ लाख मतांनी विजयी होणार आहे. मराठावाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रात इंडिया आघाडीचे वर्चस्व राहणार आहे. विदर्भातील सर्व १० जागांवर इंडिया आघाडी विजयी होणार आहे. त्यामुळे भाजपच्या पायाखालची वाळू घसरली असून प्रचाराची दिशा चुकलेल्या भाजपचा पराभव होणार असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

भाजपने २०१४ मध्ये विकासाची चर्चा केली. २०१९ मध्ये आश्वासने देण्यात आली विकास करता आली नाही. २०२४ मध्ये मात्र भाजपची दयनीय अवस्था आहे. मोदींच्या प्रचाराला प्रतिसाद मिळत नसल्यामुळे भाजपने आता भारत पाकिस्तानचा मुद्दा पुढे केला आहे. काँग्रेसने पाकिस्तानचे दोन तुकडे केले हे भाजपला माहित नाही का? यामुळे विकासच्या मुद्यावर सोडून धर्म आणि जातीय मुद्यावर निवडणूक घेवून जाण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. यामधून भाजपची दयनीय अवस्था दिसून येत आहे असे वडेट्टीवार म्हणाले.

देशातील सत्ता बदलाची सुरुवात ही महाराष्ट्रातून होणार आहे. त्यामुळे ही निवडणूक निर्णायक आहे. मी राज्यभर प्रचारासाठी फिरत आहे. कोल्हापुरमधील छत्रपती शाहु महाराज यांची जागा ४ ते ५ लाख मतांनी विजयी होणार आहे. पुण्यातील महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर हे १ लाख मतांनी विजयी होणार असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. राज ठाकरे यांचा हात कोठेतरी दाबला असावा, त्यामुळे ते भाजपचा प्रचार करत आहेत. मागिल निवडणुकांमध्ये त्यांनी विरोधात प्रचार केला होता. त्यांचा फायदा भाजपला होणार नाही. गद्दारांना राज्यातील जनता माफ करणार नाही असेही ते शेवटी म्हणाले.

# पराभव समोर दिसत असल्याने संविधान बदलण्याची भाषा

## चंद्रकांत पाटील यांचा काँग्रेसवर जोरदार प्रहार

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** काँग्रेससह विरोधकांना पराभव स्पष्टपणे समोर दिसत आहे. त्यामुळे ते संविधान बदलाची भाषा करत आहेत. वास्तविक, काँग्रेसने स्वतः च्या राजकीय फायद्यासाठी संविधानाच्या मूळ गाभ्यालाच धक्का लावल्याचा प्रहार राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. भाजपाचे अतुल साळवे आणि रिपाइं आठवले गटाचे नेते सुखदेव अडागळे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या संविधान रथाचे उद्घाटन नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.



यावेळी रिपाइंचे नेते परशुराम वाडेकर, ॲड. मंदार जोशी, बाळासाहेब खंकाळ , बापू ढाकले, राष्ट्रवादी काँग्रेसचे ॲड. राहुल म्हस्के, भारत भोसले, मायाताई पोसते, उज्ज्वलाताई सर्वगोड, जितेश दामोदरे, अतुल सावे, डॉ संदीप बुटाला, शाम देशपांडे , छायाताई मारणे, शिवसेनेचे मयुर पानसरे, मनसेचे गणेश शिंदे गणेश शिंदे, राज तांबोळी, आशुतोष वैशंपायन, यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित.

चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आपल्या सर्वांवर अनंत उपकार आहेत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५० ला आपल्याला संविधान मिळालं. त्यातून देश आणि राज्य कसं चालवलं पाहिजे; याची नियमावली तयार करण्यात आली. यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचंड मेहनत घेतली. २६ नोव्हेंबर १९४९ ला त्यांनी संविधानाचा मसूदा लोकसभेत सादर केला. त्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी तो स्विकारला गेला. त्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या दिवशी हा मसुदा लोकसभेत सादर केला; तो दिवस माननीय मोदीजींनी संविधान दिवस म्हणून जाहीर केला. या दिवशी देशभरात प्रत्येक ठिकाणी संविधानाचं पूजन केलं जातं. संविधानाच्या उद्देशिकेचं वाचन केलं जातं. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा असा सन्मान काँग्रेसने कधीही नाही.

ते पुढे म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच महिलांना आणि गरीबांना मताचा समान अधिकार मिळाला. गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष असा भेदभाव केला नाही. त्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानाचा संपूर्ण जगाने यांचा आदर्श घेऊन आपलं संविधान तयार केलं आहे.

काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल करताना ते म्हणाले की, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पासून १०६ वेळा घटनेत दुरुस्ती झाली. काँग्रेसने घटनेच्या मूळ गाभ्यालाच बोट लावले. इंदिरा गांधी यांनी स्वत:चं पद टिकवण्यासाठी घटना दुरुस्ती केली. तसेच, ९० वेळा संविधानातील कलमांचा गैरवापर करुन राज्य सरकारे बरखास्त केली. दुसरीकडे नरेंद्र मोदीजींनी गरिबांना नोकरीमध्ये १० टक्के आरक्षण मिळवून दिलं. तसेच, महिलांना ३३ टक्के आरक्षण दिलं. अटलजींनी सर्वांना शिक्षणाचा समान अधिकार मिळवून दिला. माननीय मोदीजींनी देशाची सुरक्षा लक्षात घेऊन ३७० कलम हटवताना एकदाच बरखास्त केला. असा जोरदार प्रहार केला.

ते पुढे म्हणाले की, काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काल पुण्यातील सभेत आरक्षणाची मर्यादा वाढवली पाहिजे, असं मत व्यक्त केलं. पण इतके वर्ष काँग्रेसचं राज्य देशात आणि राज्यात होतं. तेव्हा त्यांना याची आठवण का नाही झाली. १९९२ ला मराठा समाजाला आरक्षण देताना शरद पवार मुख्यमंत्री होते. पण त्यांनी मराठ्यांना आरक्षण मिळवून दिले नाही. त्यामुळे विरोधकांना पराभव दिसू लागल्याने आरक्षण बदलणारची अफवा पसरवत आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनातील पाच ठिकाणं तीर्थक्षेत्र घोषित केली. काँग्रेसने का नाही केली. त्यामुळे दलित समाजाला याची जाणीव आहे, अशी भावनाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. मंदार जोशी यांनी केले. तर आभार जितेश दामोदरे यांनी मानले.

# असलम बागवान यांचा मतदारांशी थेट संवाद

■ असलम बागवान यांचा सायकलवरून प्रचार



**पुणे :** शिरूर लोकसभा मतदारसंघातील लोकसेना पार्टी चे अधिकृत उमेदवार, ओबीसी बहुजन पार्टी चे पुरस्कृत उमेदवार असलम इसाक बागवान यांनी सायकल वरून थेट मतदारांशी संवाद साधत प्रचार केला. हडपसर,कोंढवा पाठोपाठ त्यांनी -महमदवाडी,तराडे वस्ती सय्यदनगर--काळेपडळ--या भागात प्रचार केला. त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

या प्रचाराचे वैशिष्ट्य म्हणजे सायकलला भोंगा लावून सायकल वरून अगदी अल्पखर्चात लोकशाहीला अभिप्रेत असलेली मूल्ये मतदारांपर्यंत पोहचविण्या करीता ,जनतेचे प्रश्न जमिनी स्तरावर स्वतः समजून घेण्याकरीता प्रयत्न केला गेला. असलम इसाक बागवान यांनी आपल्या प्रचाराची सुरूवात हडपसर विधानसभा मतदारसंघ महाराष्ट्र दिनी केली होती.

डॉ. सूर्यवंशी, सचिन अश्रल्हाट, अकबर मेमन, जब्बार बागवान, इब्राहिम शेख, आरिफ शेख, वीणा कदम यांनी या प्रचारात सहभाग घेतला. या प्रचारादरम्यान असलम इसाक बागवान यांनी जनतेशी संवाद साधताना त्यांच्या हे लक्षात आले की, आजपर्यंत कुठल्याच खासदाराला या जनतेने पाहिलेले नाही.त्यांची नावे देखील मतदारांना माहिती नाहीत.त्यांनी कधीही नागरीकांशी संवाद साधला नाही अथवा साधी भेटही घेतली नाही.

# पूर्व हवेलीमधील गावांमध्ये मतदारांमध्ये निरुत्साह

**लोणी काळभोर/प्रतिनिधी**

शिरूर लोकसभा मतदार संघातील पूर्व हवेलीमधील गावांमध्ये लोकसभा निवडणुका संदर्भात निरुत्साह दिसून येत आहे. मतदारांमध्ये याबद्दल कसली चर्चा होताना दिसत नाही. त्यामुळे एका आठवड्यावर येऊन ठेपलेल्या मतदानामध्ये किती टक्के मतदान होणार, हा प्रश्न आहे.

हवेली तालुक्यातील मतदार राष्ट्रवादी काँग्रेसचा पारंपरिक मतदार होता; परंतु गेल्या काही काळापासून यात बदल होऊन येथे भाजपने आपला प्रभाव निर्माण केला. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीचा देखील या मतदानावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या दोन निवडणुका हवेलीतील यशवंत सहकारी साखर कारखाना विषयाभोवती फिरल्या. आजही यशवंत चालू झालेला नाही. तसे आश्वासन नेहमीच मिळत आलेले आहे; परंतु हवेलीतील शेतकऱ्यांबद्दल राजकारण्यांच्या मनात खरोखर तळमळ असेल तर यशवंत पुन्हा चालू होणे आवश्यक आहे. यासाठी शासनाकडून चांगल्या पॅकेजची आवश्यकता आहे. याकडेच पूर्व हवेलीतील शेतकरी लक्ष लावून आहे.

लोकसभेच्या निवडणुकीची सर्वत्र रणधुमाळी चालू असली तरी पूर्व हवेलीतील पुणे, सोलापूर महामार्ग तसेच पुणे, अहमदनगर महामार्गावरील वाहतूक कोंडी हा एक अत्यंत जिकिरीचा विषय आहे. याकडे केंद्र शासनाच्या माध्यमातूनच तोडगा निघू शकतो. यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता आहे. केवळ घोषणा देऊन हा मार्ग वाहतूक कोंडीतून मुक्त होणार नाही. या मतदारसंघात विद्यमान खासदार अमोल कोल्हे आणि माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात सरळ लढत होणार आहे.

# गृहनिर्माण संस्थांमध्ये विविध उपक्रम राबवत सभासदांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे : जिल्हाधिकारी

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण संस्था असून तेथील मतदारांची संख्या अधिक आहे. शहरी भागातील मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्यादृष्टीने गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी विविध उपक्रम राबवत सभासदांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पत्राद्वारे केले आहे.

जिल्ह्यातील पुणे, शिरुर व मावळ लोकसभा मतदार संघात येत्या १३ मे रोजी मतदान होणार आहे. जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रशासनाच्यावतीने विविध उपक्रमांद्वारे मतदान जनजागृती करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मतदान जागृतीसाठी गृहनिर्माण संस्थांनी पुढाकार घ्यावा. सभासदांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी प्रत्येक गृहनिर्माण संस्थांनी विशेष सभा बोलावून सभासदांना मतदानाचे आवाहन करावे, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

मतदानाच्या तारखेचा उल्लेख असलेली निवडणूक विषयक भित्तीपत्रके संस्थेच्या दर्शनी भागात लावावीत, सभासदांना मतदार यादीत नाव शोधून देणे, मतदार ओळख चिठ्ठी पोहोचविण्यास केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना मदत करावी. पात्र मतदारांची यादी तयार करुन मतदानाच्या दिवशी सकाळपासून मतदान केलेल्या मतदारांची नोंद घ्यावी, वृद्ध व दिव्यांग सभासदांसाठी मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी शक्य असल्यास वाहनाची व्यवस्था करावी, दुपारपर्यंत मतदान न केलेल्या सभासदांच्या भेटी घेऊन मतदान करण्याबाबत प्रेरित करावे, मतदान केलेले सभासद व नवमतदारांना गुलाबपुष्प अथवा भेट वस्तू देऊन सोसायटीमधील विशेष सोहळ्यात गौरविण्यात यावे, असे आवाहनही डॉ. दिवसे यांनी केले आहे.

# 'पॅराशूट' उमेदवाराला डावलून जनता मला नक्कीच जिंकून देणार - भूषण पाटील

**मुंबई / प्रतिनिधी**

गेल्या ३२ वर्षापासून जनतेच्या दारात जाऊन त्यांची सेवा करत असल्याने आयात केलेले पॅराशूट उमेदवार केंद्रीय कॅबिनेट मंत्री पियूष गोयल यांना पराभूत करण्यासाठी वरिष्ठांनी माझी उमेदवारी जाहीर केली असून जनता मला नक्कीच जिंकून देणार आहे. असा विश्वास उत्तर मुंबई लोकसभेचे उमेदवार भूषण पाटील यांनी व्यक्त केला.




यावेळी पाटील म्हणाले, गोराई मनोरी येथे एक गाव आहे त्या ठिकाणी रुग्णालय नाही, रस्ते नाहीत, टँकरने पाणीपुरवठा होत आहे. अशी स्थिती भाजपाने करून ठेवली असल्याने जनता त्रस्त होऊन भाजपला शिव्या देत आहे. त्यामुळे आता भाजपला मतदान होणार नाही असे पाटील म्हणाले.

मुंबई मराठी पत्रकार संघाने आयोजित केलेला आयोजित केलेला 'उत्सव लोकशाहीचा २०२४' या वार्तालाप मालिकेत सोमवारी भूषण पाटील बोलत होते. यावेळी मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, कार्यवाह संदीप चव्हाण, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर उपस्थित होते.


यावेळी भूषण पाटील म्हणाले ,भाजप सरकाने गेल्या दहा वर्षात आश्वासननापलीकडे काहीच केले नाही. वाहतूक प्रश्न, फेरीवाल्यांच्या समस्या, पर्यावरण, शिक्षण, बेरोजगारी ,महागाई, रस्ते या व इतर समस्या वाढल्या असताना याबाबत भाजपाने काहीही केले नाही.असा आरोप पाटील यांनी यांनी यावेळी केला.


'विरोधकांची समस्या झाली जटील.. कारण समोर आहे भूषण पाटील' असे बोलत पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे यावेळी म्हणाले, भूषण पाटील हे स्थानिक असल्याने यांना जनतेचा पाठींबा असल्याचे चित्र आहे. तर कार्यवाह संदीप चव्हाण म्हणाले, या मतदार संघाचा इतिहास पाहता भूषण पाटील जॉईंट किलर होतील.

भाजपचा बालेकिल्ला असलेल्या मतदार संघात आपणास कोणते आव्हान वाटत आहे. या स्वाती घोसाळकर यांच्या थेट प्रश्नावर पाटील म्हणाले, पियूष गोयल हे पॅराशूट उमेदवार आहे. गोपाळ शेट्टी जर स्पर्धक असते तरी काही फरक पडला नसता. कारण जनता भाजपला त्रासली आहे. मतदार चिडले आहेत.असे पाटील म्हणाले.

# 'दस्तकारी हाट एक्स्पो'ला चांगला प्रतिसाद

## सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये १५ मे पर्यंत प्रदर्शन





**वाशी :** देशभरातील नावाजलेल्या कारागिरांनी तयार केलेले कलाकुसरीचे कपडे,साड्या,शाली,कार्पेटचा समावेश असलेल्या 'दस्तकारी हाट एक्स्पो' प्रदर्शनाला सिडको एक्झिबिशन सेंटर(वाशी,नवी मुंबई) येथे प्रारंभ झाला.दि.३ मे पासून प्रदर्शनाला प्रारंभ झाला असून १५ मे २०२४ पर्यंत रोज सकाळी ११ ते रात्री ९ यावेळेत हे प्रदर्शन आणि विक्री सुरु राहील. वाशीकरांनी या प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद दिला आहे. साड्या,ड्रेस,सूट,कुर्ती,शाल आणि कलाकुसरीच्या वस्तू हे या प्रदर्शनाचे खास आकर्षण असून खास उन्हाळ्यासाठी आणि लग्नसराईसाठी कपडे प्रदर्शनात मांडण्यात आल्या आहेत.

टसर, आरी सिल्क, मर्सिलीन(भागलपूर), कातण, मुंगा, ऑर्गनझा, टिस्यु (बनारस, उत्तर प्रदेश), बांधणी, ब्लॉक प्रिंट (राजस्थान), कांठा वर्क, जामदानी, कडवा (कोलकाता), अजरक, शिबोरी (गुजरात), चंदेरी (मध्य प्रदेश), मुंगा, टसर, हॅन्ड प्रिंटेड (आसाम), सिल्क कार्पेट, सिल्क प्रिंटेड साडी (काश्मीर) हे खास आकर्षण आहे. लग्नसराईसाठी आणि इव्हेन्ट साठी खरेदीवर आकर्षक सवलत देण्यात येत आहे.

सिल्क साड्या,चंदेरी फॅब्रिक,मुगा सिल्क,कोसा सिल्क,कलमकारी साड्या,बनारसी सिल्क साड्या,कुर्ती,बेड शिट,कार्पेट उपलब्ध करून देण्यात आला आहे.विणकामाच्या गोष्टीही एकाच छताखाली पाहायला मिळणार आहेत. प्रदर्शन स्थळ पूर्णपणे वातानुकूलित आहे. अधिक माहितीसाठी शमीन शाह (९५४१९७५९९०) यांच्याशी संपर्क साधावा.

# औद्योगिक क्षेत्राच्या मागण्यांनुसार शिक्षण द्यावे - डॉ. सीताराम

## नॅक आणि एआयसीटीईच्या अध्यक्षांनी अलार्ड विद्यापीठाच्या लोगोचे केले अनावरण

**पुणे :** आजच्या वातावरणात औद्योगिक क्षेत्राच्या मागण्या लक्षात घेऊन शिक्षण क्षेत्राने काम केले पाहिजे. अशा परिस्थितीत देशातील पहिले अलार्ड विद्यापीठ ८० टक्के प्रात्यक्षिक शिक्षण घेऊन शिक्षण क्षेत्रात उतरत आहे. असे प्रशंसनीय मत एआयसीटीईचे चेअरमन डॉ. टी.जी. सीताराम यांनी मांडले.

सेंटर फॉर एज्युकेशन ग्रोथ अँड रिसर्च संस्थे द्वारे दिल्ली येथे आयोजित केलेल्या 'थर्ड समिट ऑन विजन २०४७ इन एज्युकेशन' परिषदेत अलार्ड विद्यापीठाच्या लोगो चे अनावरण एआयसीटीईचे चेअरमन डॉ. टी. जी.सीताराम, नॅकचे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे आणि ॲलार्ड विद्यापीठाचे संस्थापक व कुलाधीपती डॉ. एल.आर.यादव यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.



डॉ. टी.जी.सीताराम म्हणाले, विद्यार्थ्यांना ७० टक्के प्रॅक्टिकल व ३० टक्के थेअरी देणारे हे पहिले विद्यापीठ आहे. शिक्षण क्षेत्रात स्तुत्य पाऊल उचलणे ही मोठी गोष्ट आहे. ज्याचा फायदा विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी निश्चितच होईल. या शिवाय स्टार्टअपमध्ये आवड असलेले आपले भविष्य घडवू शकतात.

नॅकचे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे यांनी या उपक्रमाचे कौतुक करून यशासाठी शुभेच्छा दिल्यात.

डॉ.एल.आर.यादव म्हणाले, नवीन दृष्टी, नेतृत्व, दक्षता, कठोर परिश्रम आणि समर्पण या पाच स्तंभाच्या आधारे अलार्ड विद्यापीठ आता शैक्षणिक उत्कृष्टतेला चालना देईल. 'हम अलग है, हम अलार्ड है' यामुळे येथे विद्यार्थ्यांना १०० टक्के इंटर्नशिपची हमी देखील मिळेल. भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून गुरू शिष्य परंपरा चालत आली असून ही परंपरा पुढे नेण्याचे काम विद्यापीठात अविरतपणे सुरू आहे. अशा परिस्थितीत शिक्षण जगात नव्या क्रांतीची सुरूवात करणार्या ॲलार्ड विद्यापीठाच्या नव्या लोगोचे नुकतेच अनावरण करण्यात आले.

# संस्कार शिबिरासाठी कदम दाम्पत्याचे खरोखरच कौतुक - सुनील देवडा

**हिंगोली/प्रतिनिधी**

पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक ली. हिंगोलीचे सर्वेसर्वा सुनील देवडा याने सेवासदन परिवाराच्यावतीने चालू असलेल्या संस्कार शिबिरास भेट दिली . अशी संस्कार शिबिर ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेळोवेळी अशा शिबिराचे आयोजन करणे आवश्यक आहे असे सुनील देवडा यांनी सांगितले. सध्या



विद्यार्थ्यांवर शाळा, ट्युशन यांच्या माध्यमातून अभ्यासाचा भरपूर ताण येत आहे . संस्कार शिबिरातील या सर्व आदर्श उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळेल तसेच त्यांच्यावरील अभ्यासाचा ताण कमी होईल. मुले व्यक्त व्हायला लागतील. असे मत सुनील देवडा यांनी व्यक्त केले.

या संस्कार शिबिरात अतिशय आदर्श वातावरणात ही सर्व मुले राहत आहेत या सर्व मुलांना मी रात्री कदम व धनराज कदम यांचा प्रेमळ सहवास लाभत आहे. या सर्व मुलांमध्ये नक्कीच धाडस निर्माण होईल खरोखरच कदम दांपत्याचे या उपक्रमासाठी कौतुक आहे असे सुनील देवडा म्हणाले.

# उद्धव ठाकरे हेच खरे गद्दार : देवेंद्र फडणवीस

## मावळातील महाविकास आघाडीचा उमेदवार कोणत्या शिवसेनेत पैदा झाला : फडणवीस

**रहाटणी :** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी प्रतारणा करणारे उद्धव ठाकरे हे खरे गद्दार आहेत. बाळासाहेबांच्या विचारांशी एकनिष्ठ असणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार बारणे व त्यांचे सहकारी हे तर खुद्दार आहेत, अशी कोटी करीत भाजपचे वरिष्ठ नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (सोमवारी) टीकास्त्र सोडले. मावळातील महाविकास आघाडीचा उमेदवार कोणत्या शिवसेनेत पैदा झाला, असा सवाल करीत उबाठाच्या दुटप्पीपणावर त्यांनी बोट ठेवले. महायुतीच्या विकासाच्या सुपरफास्ट गाडीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे इंजिन आहे. त्याला मावळची बोगी जोडण्याचे काम मतदारांनी करावे, असे आवाहनही त्यांनी केले.



मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे-आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचारासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये रहाटणी येथील कापसे लॉन्स येथे महायुतीचा कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यात फडणवीस बोलत होते.

व्यासपीठावर खासदार बारणे, भाजपच्या महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, रामटेकचे खासदार कृपाल तुमने, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे, बाळा भेगडे, आमदार महेशदादा लांडगे, अण्णा बनसोडे, अश्विनी जगताप, उमा खापरे, माजी खासदार अमर साबळे, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहरप्रमुख नीलेश तरस, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले, आरपीआयच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत सोनकांबळे, शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, तसेच सदाशिव खाडे, रवींद्र भेगडे, भाऊसाहेब भोईर, प्रशांत शितोळे, नाना काटे, नामदेव ढाके, सुजाता पालांडे, चंद्रकांत नखाते, शीतल शिंदे, माई ढोरे, सुरेखा जाधव, राजेश पिल्ले, प्रमोद ताम्हणकर, राज तापकीर, मोरेश्वर शेडगे, मोरेश्वर भोंडवे, काळूराम बारणे आदी पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही गल्ली-बोळाची निवडणूक नाही. ही देशाची निवडणूक आहे. आम्ही विकासाचे मुद्दे मांडत असताना महाविकास आघाडी मात्र गद्दार, खुद्दार, बोके, खोके या पलीकडे बोलायलाच तयार नाही. काँग्रेस बरोबर जायची वेळ येईल, तेव्हा मी हे दुकान बंद करून टाकीन, असे वक्तव्य बाळासाहेब ठाकरे यांनी केले होते. त्यांच्या विचारांना हरताळ फासत सत्तेसाठी काँग्रेसशी हात मिळवणी करणारे उद्धव ठाकरे हे खरे गद्दार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार बारणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बाळासाहेबांच्या हिंदुत्वाच्या विचारांशी कायम निष्ठा ठेवली आहे. त्यामुळे ते खरे खुद्दार आहेत.

मावळमधील महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे हे निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेसमधून शिवसेनेत दाखल झाले आहेत. हा उमेदवार कोणत्या शिवसेनेत पैदा झाला आहे, असा सवाल फडणवीस यांनी केला.

मावळात महायुतीचा आवाज बुलंद आहे आणि बारणे मावळातून तिसऱ्यांदा विक्रमी मताधिक्य मिळवून लोकसभेत जाणार आहेत, या तिळमात्र शंका नाही, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

देशाचा नेता निवडण्यासाठी ही निवडणूक होत आहे असे सांगून फडणवीस म्हणाले की, एकीकडे संपूर्ण जगात लोकप्रिय असलेले नरेंद्र मोदी हा पर्याय आहे तर दुसरीकडे २४ पक्षांच्या खिचडीचा राहुल गांधी हा पर्याय आहे. महायुतीच्या विकासाच्या गाडीला नरेंद्र मोदी यांचे सुपरफास्ट इंजिन आहे. त्याला सर्व पक्षांचे आणि मतदारसंघांचे डबे जोडले जाणार आहे. दुसरीकडे इंडिया आघाडीत वेगवेगळ्या दिशेला जाणारी सगळी इंजिनेच आहेत. त्यामुळे त्यांची गाडी जागेवरच उभी आहे. 'सब का साथ, सब का विकास' मोदींची कामाची पद्धत आहे. त्यानुसार देशातील प्रत्येक घटकाला या विकासाच्या गाडीत बसायची संधी आहे. या उलट राहुल गांधी यांच्या इंजिनात फक्त सोनिया गांधी व प्रियंका गांधी, शरद पवार यांच्या इंजिनात फक्त सुप्रिया सुळे, उद्धव ठाकरे यांच्या इंजिनात फक्त आदित्य ठाकरे यांनाच जागा आहे, असा शेराही त्यांनी मारला.

नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात घेतलेल्या लोकहिताच्या निर्णयांची व योजनांची यादी फडणवीस यांनी यावेळी सादर केली. मोदी सरकारने महिला, शेतकरी, तरुण, दिव्यांग अशा सर्वच घटकांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. देशातील पायाभूत सुविधांवर तब्बल १३ लाख कोटी रुपये खर्च होत आहेत. भ्रष्टाचार व कराची चोरी यांना आळा घालून मोदींनी हा निधी जनतेसाठी उपलब्ध केला आहे, असे फडणवीस म्हणाले. गेल्या दहा वर्षात केलेली कामे हा केवळ ट्रेलर होता. खरा चित्रपट तर अजून बाकी आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात खूप मोठे परिवर्तन होणार आहे, असेही त्यांनी सूचित केले.

भारताला आत्मनिर्भर बनवून एक नवा विश्वास जागृत करण्याचे काम मोदींनी केले आहे. कोविडची लस भारतातच बनवून त्यांनी तुमचे, आमचे, सर्वांचे प्राण वाचवले आहे. मॉरिशस सारख्या शंभरहून अधिक देशांना कोविडची लस पुरवून जगात भारताची वेगळी प्रतिमा निर्माण केली. आता हे सर्व देश भारताच्या पाठीशी आहेत, याकडे फडणवीस यांनी लक्ष वेधले.

या निवडणुकीत भाजप, शिवसेना, आरपीआय राष्ट्रवादी, मनसे, रासप असे सर्वच पक्ष बरोबर असल्यामुळे समोर कोणी उरतच नाही. त्यामुळे प्रत्येक मतदारसंघात विक्रमी मताधिक्य मिळवण्यासाठी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करावे. मानापमान बाजूला ठेवून सर्वांनी सामुदायिक जबाबदारी घ्यावी, अशी सूचना त्यांनी केली.

# मुरुड-बीचला पर्यटकांची गर्दी

## तप्त वातावरणातही पर्यटकांनी घेतला आनंद

**मुरुड :** मुरुड बीचवर पर्यटकांची गर्दी आज पाहावयास मिळाली. वाढलेल्या उष्णतेमुळे हैराण झालेले पर्यटकांनी समुद्रात मनसोक्त डुंबत आनंद घेतला. हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यानंतर संपुर्ण तालुक्यावर ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. दुपारनंतर तळपत्या सुर्याचे दर्शन होऊ लागले या तळपत्या उन्हात सुद्धा पर्यटकांनी मनसोक्त आनंद लुटला.

मुरुड-बीच समुद्र किनारा भरतीच्या वेळेस फेसाळणारे पाणी, पद्मदुर्ग किल्ल्याचे दर्शन, उसळणाऱ्या लाटा, किनाऱ्यावरील रुपेरी वाळू येथे पर्यटकांना आकर्षित करते. पर्यटकांच्या सोयी-सुविधात याठिकाणी असलेली स्पीडबोट, बनाना, बंफर तसेच घोडा-उंटावरील सफर, घोडागाडी , बग्गी सवारी, डबल सीट सायकल पर्यटनाचा आनंद द्विगुणीत करते. याचा पर्यटक मनसोक्त आनंद लुटत होते.

बीचवर विविध खाद्य-पेय चहा-नाष्टा सोयी सुविधा उपलब्ध आहेत. दर शनिवार, रविवार तसेच सुटीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देत असतात. रस्त्यावर दुतर्फा वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात. वेळप्रसंगी ट्रॅफिक जॅमलाही सामोरे जावे लागते. देश-विदेशातील पर्यटक देखील आवर्जून भेट देत असतात. यामुळे मुरुडबीचला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.

मुरुड बीचवर सुशोभीकरण करण्याचे काम सद्या जोरात सुरू आहे. त्यामुळे जास्तीत जास्त पर्यटक मुरूड बिचवर थांबतील, विनामूल्य पार्किंगची व्यवस्था केली जात आहे. उन्हापासून संरक्षण करण्यासाठी शेड बांधण्यात येत आहेत बैठकीची व्यवस्था केली जात आहे. बाजूलाच विश्राम बाग आहे, या ठिकाणी लहान मुलांना खेळण्यासाठी विविध प्रकारचे खेळणी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामुळे पर्यटक मुरूड बीचकडे जास्तीत जास्त आकर्षित होत आहेत.



# बीड लोकसभा मतदारसंघात ११ दिव्यांग तर २२ युवा मतदान केंद्र

**बीड :** बीड लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा निहाय एकूण २३५५ मतदान केंद्र असणार आहेत. यापैकी ११ मतदान केंद्रांवर दिव्यांग तर २२ मतदान केंद्रांवर युवा मतदान अधिकारी कर्मचारी असणार आहेत.



भारतीय निवडणूक आयोगाने मतदानाच्या प्रक्रियेला अधिक सुरळीत आणि व्यापक करण्यासाठी काही नाविन्यपूर्ण उपक्रम आखलेल्या आहेत. या अंतर्गत तरुण मतदारांनी मतदान प्रक्रियेचा भाग व्हावा यासाठी युवा मतदान केंद्र उभारलेली आहेत. दिव्यांग नागरिकांनाही मुख्य प्रवाहात आणून त्यांनी मतदान प्रक्रियेचा भाग व्हावा यासाठी दिव्यांग मतदान केंद्र नियोजित केले आहे.

दिव्यांग मतदान केंद्रावर १ मतदान केंद्र अध्यक्ष, १ सहाय्यक मतदान केंद्र अध्यक्ष व २ इतर मतदान अधिकारी असे एकूण ४ दिव्यांग अधिकारी, कर्मचारी असतील. असे प्रत्येक तालुक्यात ०१ दिव्यांग मतदान केंद्र आहे. असे एकूण ११ मतदान केंद्र बीड लोकसभा मतदारसंघात आहेत.

तसेच बीड लोकसभा मतदार संघातील एकूण सहा विधानसभा मतदार संघात २२ मतदान केंद्र ही युवा (स्त्रीपुरुष) मतदान केंद्र असणार आहेत. प्रत्येकी ०१ तालुक्यात ०२ युवा मतदान केंद्र असणार आहेत. ज्यांचे वय ३५ पेक्षा कमी असेल असे नागरिक हे युवा मतदान केंद्र चालवणार आहेत या मतदान केंद्रातही १ मतदान केंद्र अध्यक्ष, १ सहाय्यक मतदान केंद्र अध्यक्ष २ इतर मतदान अधिकारी असे ४ युवा (स्त्रीपुरुष) मतदान अधिकारी कर्मचारी असणार आहेत.

बीड लोकसभा मतदारसंघात अल्पसंख्यांक लोकसंख्या अधिक असून यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात परदानशीन बुथ् उभारण्यात आलेले आहेत. म्हणजे प्रत्येक बुथवर एक महिला सहाय्यक अधिकारी असणे आवश्यक आहे. याप्रमाणे गेवराई विधानसभा मतदारसंघात २७, माजलगाव विधानसभा मतदार संघात ४८, बीड विधानसभा मतदारसंघात १३६, आष्टी विधानसभा मतदारसंघात २६, केज (राखीव) विधानसभा म तदारसंघात ३९, परळी विधानसभा मतदारसंघात ४२ असे एकूण ३१८ परदानशीन बुथ उभारण्यात आलेले आहेत.

बीड लोकसभा मतदारसंघात एकूण सहा विधानसभा मतदार संघ आहेत. गेवराई विधानसभा मतदारसंघात ३९७ मतदान केंद्र, म ाजलगाव विधानसभा मतदारसंघात ३७९, बीड विधानसभा मतदारसंघात ३८२, आष्टी विधानसभा मतदारसंघात ४४०, केज विधानसभा मतदारसंघात ४१५, परळी विधानसभा मतदारसंघात ३४२ असे एकूण २३५५ मतदान केंद्र बीड लोकसभा मतदारसंघात असणार आहेत.

# विदेशी प्रतिनिधी मंडळ रायगड जिल्हा निवडणूक प्रक्रीयेची पाहणी करणार

**रायगड :** भारत निवडणूक आयोगाने इतर देशांच्या निवडणूक व्यवस्थापन सस्था (एचइी) यांच्याबरोबर आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सहभागासाठी ळपींशीपरींळेपरश्र एश्रशलींळेप तळीळींी झ्रीसीराश (खएतझ) कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याअंतर्गत विदेशी प्रतिनिधी मंडळ निवडणूक प्रक्रीयेची पाहणी करण्याकरीता दिनांक ६ ते ८ मे, २०२४ या कालावधीत रायगड जिल्हा भेट देणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

सदर प्रतिनिधी मंडळामध्ये ७ सदस्य असून हे सदस्य रायगड लोकसभा मतदार संघातील विविध ठिकाणी भेट देऊन निवडणूक प्रक्रियेची पाहणी करणार आहेत. महाराष्ट्रातील केवळ रायगड जिल्ह्यामध्ये हे मंडळ भेट देणार आहे.

या विदेशी प्रतिनिधी मंडळ मध्ये बांग्लादेशचे २ प्रतिनिधी महंमद मोनिरुझ्झमन टी , जी एम शाहताब उद्दीन (बांग्लादेश निवडणूक आयोग अधिकारी)

कझाकिस्तान देशाचे २ प्रतिनिधी नुरलान अब्दिरोव, आयबक झीकन(केंद्रीय निवडणूक आयोग कझाकीस्तान), श्रीलंका देशाच्या सिलजा हिलक्का पासिलीना(संचालक श्रीलंका)

झिम्बाबे देशाचे न्यायमूर्ती प्रिशीला चिगूम्बा आणि सिम्बराशे तोंगाई (केंद्रीय निवडणूक आयोग झिम्बोबे)आहेत.

हे विदेशी प्रतिनिधी मंडळ उद्या दि. ६ मे रोजी सकाळी ९ वा अलिबाग येथे मतदान प्रक्रियेची पाहणी करणार आहेत. पोलिंग पार्टी चे आगमन व प्रस्थान, साहित्य वाटप याची जी एस एम कॉलेज येथे पाहणी करणार आहेत. त्यानंतर दु. ३ वा जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या समवेत बैठक होणार आहे.

दि. ७ मे रोजी विविध मतदान केंद्राना भेटी देऊन प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेची माहिती घेणार आहेत.

# कागदी शिधापत्रिका होणार आता इतिहासजमा

## मिळणार ई-शिधापत्रीका

**नांद्रे :** गेल्या अनेक दशकांपासून प्रचलित असणारी कागदी शिधापत्रिका आता इतिहासजमा होणार आहे. लाभार्थ्यांना शासनामार्फत आता ई-शिधिपात्रिका देण्यात येणार आहे.



सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत सवलतीत धान्य किंवा अन्य शासकीय योजनांच्या लाभासाठी प्रत्येक कुटुंबाकडे शिधापत्रिका असते. योजना न घेणाऱ्या कुटुंबांना महसुली पुरावा म्हणूनही ती आवश्यक ठरते. अनेक कुटुंबे चरितार्थासाठी गाव सोडून अन्यत्र राहतात. त्यांच्या शिधापत्रिकेवर गावाकडील पत्ता असल्याने धान्यही गावातील दुकानातच मिळते. दूर गावी राहणाऱ्या कुटुंबांना धान्यासाठी गावी येणे शक्य होत नव्हते. त्यामुळे शासनाचा धान्य वितरणाचा मूळ हेतू साध्य होत नव्हता. स्वस्त धान्य दुकानदारांकडून त्यांच्या धान्याची काळ्या बाजारात विक्री होत असल्याच्या तक्रारीही यायच्या. यावर उपाय म्हणून आधार सिडींग, पॉस मशिन, बोटांचे ठसे आदी उपाययोजना करण्यात आल्या.

बानव्या योजनेनुसार आता सर्वच म्हणजे केशही, पिवळी अशा शिधापत्रिका प्रत्यक्षात देण्याचे बंद करण्यात येणार आहे. त्याऐवजी ई-शिधापत्रिका मिळतील. त्यासाठी नागरी पुरवठा विभागाचे प मोबाईलवर डाऊनलोड करुन घ्यावे लागेल. ई शिधापत्रिकेसाठी कागदपत्रे अपलोड करावी लागतील. तहसील कार्यालयात पुरवठा निरीक्षक आणि तहसीलदार या कागदपत्रांची पडताळणी करून ई-शिधापत्रिका मंजूर करणार आहेत. जे नागरिक संगणक साक्षर नाहीत किंवा ज्यांना मोबाईल पमध्ये कागदपत्रे अपलोड करता येणे शक्य नाही, त्यांना तहसील कार्यायल किंवा सेतू केंद्रात जाऊन ई-शिधापत्रिकेसाठी कागदपत्रे अपलोड करता येणार आहेत.

**फसवणूक टळणार**

**आतापर्यंत शिधापत्रिका काढून देताना एजंटांकडून नागरिकांच्या फसवणुकीचे प्रकार घडायचे. पण आता ती टळणार असून सर्व प्रक्रिया ऑनलाईन होणार आहे. गैरप्रकारांना कोणताही थारा राहणार नाही. पवर कागदपत्रे अपलोड केल्यानंतर त्याची पडताळणी होणार आहे. त्यामुळे बनावट कागदपत्रे दाखल करता येणार नाहीत.**

# उद्धव ठाकरेंना मोठा धक्का, नाशिकमध्ये खिंडार



**मुंबई :** नाशिक लोकसभा मतदारसंघातउद्धव ठाकरेगटाला मोठा धक्का बसला आहे. याठिकाणी महाविकास आघाडीने राजाभाऊ वाजे यांना उमेदवारी दिल्यानंतर ठाकरे गटाचे विजय करंजकर हे नाराज झाले होते. करंजकर हे उबाठा गटाचे लोकसभा संघटक म्हणून काम करत होते.

मात्र आता विजय करंजकर यांनी मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. करंजकर हे लोकसभेची जोरदार तयारी करत होते. परंतु ऐनवेळीउद्धव ठाकरेंनीशब्द फिरवला आणि मला तिकिट नाकारलं असा आरोप करंजकर यांनी केला होता.- ऊत्एठढ्खडएचएछ्ढ-वी लूरात्री उशिरा विजय करंजकर यांनी शिवसेनेत प्रवेश केला, यावेळी ते म्हणाले की, शिवसैनिकांचा कैवारी म्हणूनएकनाथ शिंदेंच्याउपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. गेली १३ वर्ष मी शिवसैनिक म्हणून बाळासाहेब ठाकरेंच्या तत्वाप्रमाणे काम केले. ३ वेळा लोकसभेला इच्छुक होते. गेल्या दीड वर्षापासून मी लोकसभा मतदारसंघ फिरून प्रचार, प्रसार केला. पण ऐनवेळी जे इच्छुक नव्हते त्यांना उमेदवारी देऊन माझ्याशी विश्वासघात, गद्दारी केली. जी काही माझी फसवणूक झाली त्याची दखलही कुणी घेतली नाही.

बाळासाहेब ठाकरेंना अभिप्रेत असलेलं काम न करता संघटनेत काम सुरू आहे असा आरोप करंजकरांनी केला. तसेच सध्याच्या उबाठा गटात तत्व आणि सत्व उरलं नाही. मातोश्रीच्या आजूबाजूला अशी लोक फिरतायेत, ते जे घात करतायेत त्यांना अद्दल घडेल. पडद्याआडचे गद्दार मातोश्रीवर लपलेले आहेत.

आगामी काळात बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे यांना अभिप्रेत असलेले काम एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात करून दाखवू असा विश्वास विजय करंजकर यांनी व्यक्त केला.दरम्यान, जे आमच्यावर आरोप करतात, त्यांनी आधी आत्मपरिक्षण केले पाहिजे त्यानंतर दुसऱ्यावर आरोप केले पाहिजेत.

विजय करंजकरांसारखा अनुभव अनेक लोकांना आलेला आहे. तुम्ही तिथे होता तोपर्यंत उत्तम पदाधिकारी आणि कचरा म्हणून बोललं जाईल. ५० आमदार, १३ खासदार यांच्यासह शेकडो पदाधिकारी आज शिवसेनेत येतायेत. हे सर्व चुकीचे आणि एक माणूस बरोबर असं होत नाही. त्यांना सल्ले देत नाही. ते मोठमोठ्या लोकांना सल्ले देतात, सुप्रीम कोर्टालाही सल्ले देतात असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला

.विजय करंजकरांवर शिवसेना उपनेतेपदाची जबाबदारीकुणासोबतही असा विश्वासघात, फसवणूक होता कामा नये, मी भला, माझं कुटुंब भलं एवढ्यापुरते मर्यादित असलेल्या उद्धव ठाकरेंकडून दुसरी अपेक्षा नाही.

बाळासाहेबांचा कडवट शिवसैनिक, कुशल संघटक, संघटनेसाठी जीवाची पर्वा न करता वाहून घेणारा कार्यकर्ता विजय करंजकर आज आमच्यासोबत आलेत, त्यांचे स्वागत करतो असंही मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं. विजय करंजकर यांची शिवसेना उपनेते आणि नाशिक जिल्हा संपर्क प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

# पन्हाळा गिरिस्थान नगरपरिषद मार्फत आगळे वेगळे लोकसभा मतदान केंद्र

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा:** केंद्रीय निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग यांचेकडील सुचनेनुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक करिता आदर्श मतदान केंद्र या संकल्पनेनुसार आगळे वेगळे मतदान केंद्र उभारणे बाबत कळवले आहे. या संकल्पनेची अंमलबजावणी पन्हाळा गिरिस्थान नगरपरिषद चे मुख्याधिकारी चेतनकुमार माळी, यांनी आपल्या नगरपरिषद हद्दीमध्ये माझी वसुंधरा ही संकल्पना वापरून मतदान केंद्र उभे केले आहे.



याकरिता महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने माझी वसुंधरा अभियान राबवले जात आहे. माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत माझी वसुंधरा मतदान केंद्र, कुमार विद्या मंदिर पन्हाळा येथे उभारण्यात आले आहे. ४८- हातकणंगले लोकसभा मतदार संघ अंतर्गत २७७ - शाहूवाडी विधानसभा मतदार संघ मधील मतदान केंद्र क्रमांक २६८ व २६९ चा समावेश यामध्ये होतो. माझी वसुंधरा अभियानामध्ये निसर्गाच्या पंचमहाभूतांच्या तत्वावर काम केले जाते. यामध्ये भूमी, जल, वायू, अग्नी आणि आकाश या तत्त्वांचा समावेश होतो. या उपक्रमातून वातावरणीय बदल आणि पर्यावरणाच्या समस्यांबद्दल नागरिकांना जागृत करून पर्यावरणाच्या सुधारणेसाठी प्रयत्न केले जातात. वस्तुत:पर्यावरणाच्या आणि हवामान बदलाच्या संकटाचा सामना करण्यासाठी लोकसहभाग अत्यंत महत्वाचा ठरतो. त्याचप्रमाणे पर्यावरणपूरक जीवनशैली ही लोक चळवळ व्हावी हा या सर्व अभियानाचा पाया आहे. यामध्ये कार्बन सिक्वेस्ट्रेशन, हरितगृह वायूचे उत्सर्जन कमी होणे आणि शाश्वत निसर्गपूरक जीवनशैलीचा अंगीकार लोकांकडून व्हावा. या तीन स्तंभावर माझी वसुंधरा अभियान उभे राहिले आहे.

कुमार विद्या मंदिर पन्हाळा येथे माझी वसुंधरा मतदान केंद्र स्थापित केले असून पंचमहाभूतांचा म्हणजेच भूमी, जल, वायू, अग्नी आणि आकाश या तत्त्वांचा प्रचार व प्रसिद्धी केली आहे. तसेच मतदान जनजागृती चे बॅनर देखील लावण्यात आलेले आहेत. तसेच उष्माघात पाहता मतदान केंद्र समोर मंडप घालण्यात आलेला आहे व थंड पिण्याच्या पाण्याची सोय देखील केंद्रावर करण्यात आलेली आहे. माझी वसुंधरा मतदान केंद्र स्थापित करणे करिता मुख्याधिकारी चेतनकुमार माळी यांच्या मार्गदर्शनाखाली नगर अभियंता जयश्री देवकुळे, विभाग प्रमुख मुकुल चव्हाण, वरिष्ठ लिपिक विश्वास रामाणे, मुकादम जयवंत कांबळे यांनी काम पाहिले.

# पाटण मतदारसंघात ४०९ मतदान पथके केंद्राकडे रवाना...






**पाटण / प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक साठी ७ मे रोजी मतदान प्रक्रियेसाठी बाळासाहेब देसाई महाविद्यालयातून आज उद्यासाठी होणाऱ्या मतदानासाठी सुमारे ४०९ पथके १२ वाजेपर्यंत पाटण मधील केंद्राकडे रवाना झाल्याची माहिती सहा निवडणूक निर्णय अधिकारी सुनील गाढे यांनी दिली आहे.

पाटण मतदारसंघात एकूण ४०९ मतदान केंद्रासाठी ८४० पोलीस व होमगार्ड कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दुर्गम भागातील केंद्रावरील मतदान यंत्रांचा अतिरिक्त सुरक्षेसाठी विशेष कल्या रंगाची सुरक्षा बॅग पुरविण्यात आली आहे.

४०९ मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष व मतदान कर्मचारी म्हणून २०४५ कर्मचारी यांची नियुक्ती केली आहे. साहित्य वाट पकरिता एकूण ४२ टेबल लावण्यात आले होते. व त्याकरिता सुमारे १५० महसूल कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. याशिवाय पाटण मधील मतदान केंद्रावर जाणारे कर्मचारी याना सातारा जिल्ह्यातील अन्य मतदारसंघात सोडण्यासाठी १८ बसेस पहाटे पासून रवाना करण्यात आल्या. तसेच पाटण मध्ये बाहेरून देखील १८ बसेस द्वारे मतदान कर्मचारी सकाळी ९ वाजेपर्यंत पाटण मध्ये पोहचले होते.

डिव्याग केंद्र(कोंजवडे),युवा केंद्र,( पाटण व कवठेकर वाडी) महिलांचे केंद्र (विहें व पाटण शहर)इत्यादी मतदान केंद्रावरील पथकांना सह निवडणूक निर्णय अधिकारी सुनील गाढे व तहसीलदार पाटण यांनी स्वतः साहित्य वाटप करून शुभेच्छा दिल्या. मतदान पथके केंद्रावर पोहचविणे कामी एकूण ४७ बसेस व ११९ जीप या वापरण्यात आल्या आहे. दुर्गम भागातील केंद्रावर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

साहित्य वाटपाच्या ठिकाणी मतदान कर्मचारी तसेच पोलीस कर्मचारी यांची पाणी, चहा, नाश्त्याची तसेच जेवणाची सोय करण्यात आली होती. याशिवाय मतदान कर्मचारी याना केंद्रावर मुक्काम करावा लागणार असल्याने जीवनोपयोगी साहित्य जसे की कोलगेट,साबण,बिस्कीट पुडे इत्यादीचे देखील वाटप करण्यात आले आहे. वैद्यकीय विभागामार्फत विशेष कक्ष वाटपाच्या वेळी उभारण्यात आला होता. तसेच प्रत्येक मतदान पथकासोबत मतदान कर्मचारी याना उन्हाळ्यात त्रास होऊ नये म्हणून जठड ची पाकीट देखील पुरविण्यात आली आहे. सहा निवडणूक निर्णय अधिकारी सुनील गाढे व तहसीलदार पाटण श्री अनंत गुरव हे स्वतः कर्मचाऱ्यांमध्ये फिरून साहित्य वाटपाची माहिती घेत होते ,त्यांना आवश्यक त्या सूचना देत होते, आलेल्या कर्मचारी यांची आस्थेवाईकपणे विचारपूस करत होते. साहित्य वाटपाचे पोलीस व महसूल विभागाने व्यवस्थित नियोजन केल्याने उन्हाचा तडाखा वाढण्या पूर्वीच सर्व मतदान पथके केंद्राकडे रवाना झाली आहे.

सर्व मतदान यंत्रे साहित्य वाटपाच्या ठिकाणे आणणे ते झोन निहाय एकत्र करणे व त्याचे अचूक वाटप करणे याकामी पंडित पाटील नायब तहसीलदार ,श्रीकांत शेंडे नायब तहसीलदार,विलास गभाले मंडळ अधिकारी पाटण सचिन थोरात अव्वल कारकून ,विनायक पाटील ,संजय जंगम ,अमोल कांबळे ,तसेच सर्व तलाठी मंडळ अधिकारी व महसूल सहायक ,कोतवाल ,शिपाई कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.तसेच पोलीस विभागामार्फत पोलीस उपअधीक्षक सविता गर्जे यांचे मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला असून तालुक्यातील संवेदनशील भागात विशेष लक्ष ठेवणार आहेत.

स्व. पै. केशवराव ढोरे प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित

# सामुदायिक विवाह सोहळ्यात मावळमधील ११ जोडपी विवाहबद्ध




**वडगाव मावळ :** स्व.पै. केशवराव ढोरे प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सामुदायिक विवाह सोहळ्यात हजारो वऱ्हाडी मंडळींच्या उपस्थितीत मावळ तालुक्यातील सर्वसामान्य कुटुंबातील ११ जोडपी विवाहबद्ध झाली.

वडगाव मावळ येथील ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज मंदिर प्रांगणात संपन्न झालेल्या या सोहळ्याची सुरुवात श्रींच्या अभिषेकाने झाली. सकाळी संपन्न झालेल्या साखरपुडा प्रसंगी सरिता श्रीरंग बारणे, सारिका सुनील शेळके तसेच माजी नगराध्यक्ष मयूर ढोरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यानंतर वधू वरांचा हळदी समारंभ, वऱ्हाडी मंडळींचे भोजन तसेच नवरदेवांची भव्य मिरवणूक पार पडली. यावेळी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात पदाधिकारी व वऱ्हाडी मंडळींनीही सहभाग घेतला.

सायंकाळी हजारो संख्येने उपस्थित असलेल्या वऱ्हाडी मंडळींच्या उपस्थितीत लग्न समारंभ पार पडला. यावेळी हभप मंगल महाराज जगताप, खासदार श्रीरंग बारणे व माजी महापौर संजोग वाघेरे यांनी वधू वरांना शुभाशीर्वाद दिले तर आमदार सुनील शेळके, संत तुकाराम साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

याप्रसंगी सोहळ्यातील अन्नदान केल्याबद्दल बाळासाहेब तुमकर व भारती तुमकर यांचा तर जोडप्यांना संसारपयोगी भांडी दिल्याबद्दल उद्योगपती संजय भोज व मधुगंधा भोज तसेच वधुंना चांदीचे अलंकार देणारे सुशील बहिरट यांचा प्रतिष्ठानच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला, वधू वरांना लकी ड्रॉ द्वारे बक्षीस म्हणून वस्तूही देण्यात आल्या.

प्रास्ताविक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष पंढरीनाथ ढोरे यांनी तर स्वागत सोहळा समिती अध्यक्ष रोहिदास गराडे यांनी केले, सूत्रसंचालन सचिव गणेश विनोदे, संचालक गणेश ढोरे यांनी केले व आभार संचालक अतुल राऊत यांनी मानले. सोहळा समितीचे कार्याध्यक्ष बाळासाहेब तुमकर, कार्यक्रम प्रमुख अरुण वाघमारे, पदाधिकारी नंदकुमार ढोरे, योगेश वाघवले, संभाजी येळवंडे, अभिजीत ढोरे, अनिल कोद्रे, संतोष निघोजकर तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी विलास दंडेल, प्रवीण ढोरे, राजेंद्र वहिले, काशिनाथ भालेराव, अर्जुन ढोरे, विवेक गुरव सोमनाथ धोंगडे, अजय धडवले, सुनील शिंदे, शंकर ढोरे, खंडू काकडे, महेश तुमकर, शरद ढोरे, अविनाश कुडे, सतीश गाडे, विनय लवंगारे, अनिकेत भगत, दर्शन वाळुंज, अक्षय बेल्हेकर, गणेश झरेकर, संजय दंडेल, कार्तिक यादव, प्रमोद घाग, केदार बवरे आदींसह महीला पदाधिकाऱ्यांनी संयोजन केले.

# ध्यानधारना आणि विज्ञान या गोष्टी एकत्र आणणे काळाची गरज - डॉ. स्वामी शैलेंद्र सरस्वती




**मुंबई/प्रतिनिधी**

आपली भौतिक कार्ये आणि मन:शांती याची सांगड जगाला विविध संभाव्य संकटापासून वाचवण्यासाठी कामी येणार आहे. त्यामुळे मानवाने विचारपूर्वक वागत जीवनाचा आनंद घेतला पाहिजे. असे विचार सद्गुरू ओशो यांचे लहान बंधू डॉ. स्वामी शैलेंद्र सरस्वती यांनी मुंबईत एका पत्रकार परिषदेत मांडले.

राजस्थानमधील सोजत येथे २८ एकरांमध्ये १ लाख चौरस फुटाचे बांधकाम २० कोटी रूपये खर्च करून शिखरचंद जैन समाजसेवक ओशो ध्यान केंद्र उभारणार आहेत. हे ध्यानकेंद्र १८ महिन्यांत तयार होणार आहे. या ध्यान केंद्राच्या माध्यमातून ध्यान व योग मानवाला कसे आनंदी ठेऊ शकते याची माहिती देत असताना डॉ. स्वामी शैलेंद्र सरस्वती बोलत होते.

सोजत स्वर्ण भवनच्या मुंबईतील काळबादेवी येथील इमारतीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार असल्याने ते महाराष्ट्रात आले आहेत. उद्घाटन नंतर ओशो मेडिटेशन, प्रवचन आणि मानवी जीवनाची गुरुकिल्ली या विषयावर सकाळी ९ ते सायंकाळी ५ या दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे अशी माहिती हिंदुस्तान चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष आणि फिक्कीचे कार्यकारी समिती सदस्य शिखरचंद जैन यांनी यावेळी दिली.

या कार्यक्रमाचे सन्माननीय पाहुणे महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि न्यायाधीश के. के. ताथेड हे असतील.

# पत्रकारितेत राजकारणाशिवाय दुसरे विषयही महत्त्वाचे - विजय कुवळेकर

**मुंबई/प्रतिनिधी**

राजकारणाशिवाय दुसरे इतर विषय ही महत्वाचे आहेत. प्राधान्य कशाला द्यावे याचे भान अपवाद वगळता काही मालक संपादक पत्रकार विसरत चालले आहेत. अनेक पत्रकारांना भूगोल, इतिहास, समाजशास्त्र इतर विषयाचे आकलन नाही. यासाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करून देण्याची गरज आहे.असे मत ज्येष्ठ संपादक विजय कुवळेकर यांनी महाराष्ट्र संपादक परिषद ने आयोजित केलेल्या पत्रकारिता गौरव आदर्श साहित्य पत्रकारिता सन्मान पुरस्कार व विशेष पुरस्कार २०२३ सोहळ्यावेळी व्यक्त केले.



शनिवार ४ मे रोजी मुंबईतील दादर- माटुंगा कल्चरल सेंटर, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा पश्चिम येथे सायंकाळी आयोजित करण्यात आला. होता. महाराष्ट्र संपादक परिषदेचे संस्थापक स्व. यशवंत पाध्ये यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या समारंभाला अध्यक्ष म्हणून जेष्ठ पत्रकार श्यमाजी मालकर, प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ संपादक शविजय कुवळेकर आणि जेष्ठ नाटककार शसुरेश खरे उपस्थित होते. त्याचप्रमाणे दैनिक देशोन्नतीचे संपादक श प्रकाश पोहरे आणि जेष्ठ साहित्यिक रवींद्र आवटी यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुसंवादिनी शिबानी जोशी यांनी केले.तर मुंबई आऊटलूक मीडिया हाऊस चे मुख्य संपादक व महाराष्ट्र संपादक परिषद चे अध्यक्षसंजय मलमे यांनी आभार मानले.

पत्रकारिता साहित्य गौरव पुरस्कारासाठी झी २४ तास वृत्तवाहिनीचे संपादक शकमलेश सुतार, दैनिक ठाणे वैभवचे संपादक मिलिंद बल्लाळ, दैनिक संध्याकाळच्या संपादिका रोहिणी खाडिलकर, आयबीएन लोकमत चे प्रतिनिधी महेश तिवारी, एबीपी माझा वृत्तवाहिनीच्या पत्रकार ज्ञानदा कदम, पुण्य नगरी - ठाणे चे निवासी संपादक हेमंत जुवेकर, महाराष्ट्र टाइम्स चे प्रतिनिधी वैभव वझे, सीएनएन न्यूज १८ च्या ब्युरो चीफ विनया देशपांडे (पंडित), मराठवाडा साहित्य संमेलन २०२३ चे माजी अध्यक्ष महेश माळवे, साप्ताहिक लोकवृत्तान्त चे संपादक एकनाथ बिरवटकर यांना पुरस्कार देण्यात आले.

पत्रकारिता साहित्य गौरव विशेष पुरस्कारासाठी जेष्ठ साहित्यिक रवींद्र आवटी, दैनिक नांदेड एकजूटच्या जेष्ठ संपादिका अनुराधा विष्णूपुरीकर, सहकार आणि शैक्षणिक क्षेत्रातील आनंदराव (दादा) माईगडे, लोककला शाहीर रुपचंद चव्हाण यांना पुरस्कार दिले.

महाराष्ट्र संपादक परिषद ही संस्था कोणत्याही संघटनेशी समांतर किंवा स्पर्धात्मक कार्य न करता पत्रकारितेच्या उद्दिष्टांसाठी कार्यरत राहणारी संस्था आहे. ही संस्था म्हणजे संपादक-मालक प्रामुख्याने दैनिकांचे व त्यांनी नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी यांची संघटना आहे. ही संस्था ध्येयासक्त, पारदर्शी आणि विश्वासार्ह आदर्श पत्रकारितेसाठी वचनबद्ध असेलेली संस्था आहे. ही संस्था मराठी भाषा, संस्कृती व अस्मितेशी वचनबद्ध असून, या संस्थेने वाचन संस्कृतीचे संवर्धन व ग्रंथालय चळवळीमध्ये सहभाग घेतला होता. विविध प्रसार माध्यमांशी अनुबंध निर्माण करून त्यांच्या सहयोगातून लोकप्रबोधन, लोकशिक्षण आणि लोकजागृती यांसाठी सहभाग घेणे, पत्रकारांसाठी कल्याणकारी उपक्रम राबविणे, पत्रकारिता आणि साहित्य यांचा अनुबंध राखणे आणि नैसर्गिक आणि आपदग्रस्त पत्रकारांसाठी साहाय्य करणे हे महाराष्ट्र संपादक परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट राहिलेले आहे.

पान १ वरून

## नाराज नसीम खान यांचा 'यू टर्न'; राजीनामा मागे

आपण प्रचार करणार असल्याचे सांगून राजीनामा मागे घेत असल्याचे जाहीर केले. दोन दिवसांनी त्यांनी राजीनामा मागे घेत असल्याचे जाहीर केले.

नसिम खान यांनी म्हटले की, काही दिवसांपूर्वी मी अल्पसंख्यक समाजाची भावना व्यक्त केली. ज्येष्ठ नेत्यांपुढे माझी भावना व्यक्त केली. माझ्या पक्षाचे अध्यक्ष खर्गे जी, वेणूगोपाल जी, रमेश चेन्नीथला जी, नाना पटोले, बाळासाहेब थोरात सर्व नेत्यांनी या भावनेचा सन्मान केला आहे. गंभीर रूपाने सर्वांनी मला भरपाई देऊ असे सांगितले आहे. माझी जबाबदारी आहे जिथे चुकी होत असेल तिथे कुठलाही समाज पक्षापासून दूर जाणार असेल तर माझी भावना मांडली. सर्वांनी याची दखल घेतली त्याचा मी आभारी आहे.

मी राजीनामा मागे घेत आहे. सर्व काँग्रेसचे नेते ज्यांनी राजीनामा दिला आहेत त्यांनी मागे घ्यावा. राहुल गांधी यांच्या लढ्यात सर्वांनी एकत्र यावं. संविधान बदलण्याचा जो कट आहे त्यांना न्याय देण्यासाठी इंडिया आघाडीला समर्थन करायचं आहे असंही नसिम खान यांनी म्हटले.

## फडणवीसांकडून अभिजीत पाटलांना आमदारकीचे संकेत

करण्यात आली. मात्र, यानंतर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. तसेच यावर मार्ग काढण्याची विनंती केली होती. त्यानंतर अभिजीत पाटील हे भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा रंगली होती. या घडामोडीनंतर रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचाराच्या निमित्ताने विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर रविवारी जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी अभिजीत पाटील यांच्याबाबत सूचक विधान केल्यामुळे तर्कवितर्क लावले जात आहेत.

## कुलरच्या विजेचा धक्का बसून चिमुकलीचा मृत्यू

होते. मात्र, त्यांच्या लक्षात येईपर्यत वेळ निघून गेली होती. कुटुंबीय व परिसरातील नागरिकांनी तिला तातडीने रुग्णालयात उपचारासाठी नेले असता, डॉक्टरांनी मुलीचा मृत्यू झाल्याचे सांगितले. याची माहिती मिळताच जुने शहर पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. गोगे कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## उज्ज्वल निकमांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा!

खात्याला दिली होती. मुंबईतील दोन हॉटेलवर हल्ला करण्यासाठी बोट निघाली असून त्याचे अक्षांश आणि रेखांश असे आहेत, अशी देखील माहिती अमेरिकन एजन्सीने दिलेली होती. तरी देखील सदर माहिती गुप्तचर संघटनेचे अधिकारी तत्कालीन अधिकारी प्रभाकर अलोक यांनी मुंबई पोलिस व महाराष्ट्र शासन यांना दिलेली नव्हती.

मात्र, खटला सुरू झाल्यानंतर आरएसएस आणि उज्वल निकम या दोघांनी मिळून त्यावेळी शासन आणि कोर्टाची दिशाभूल केल्याचा आरोप 'हु किल्ड करकरे' पुस्तकाचे लेखक माजी पोलीस अधिकारी शमशुद्दीन मुश्रीफ यांनी केला आहे.

उज्ज्वल निकम हे या सगळ्या बाबींसाठी संपूर्णपणे जबाबदार आहेत, त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी 'हु किल्ड करकरे' पुस्तकाचे लेखक माजी पोलीस अधिकारी शमशुद्दीन मुश्रीफ यांनी केली आहे.

दरम्यान, शहीद हेमंत करकरे यांच्याबद्दल केलेलं विजय वडेट्टीवारांचे विधान हे त्यांचं व्यक्तिगत असून त्यांना कोणती शासकीय माहिती असेल. मात्र, हे काँग्रेसचं मत नाही, अशी प्रतिक्रिया काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## कोरेगाव तालुक्यातील नऊ गावांचा मतदानावर बहिष्कार


यांना याबाबतचे निवेदन सादर करण्यात आले.

या संघर्षाबाबत बोलताना नंदकुमार माने म्हणाले, धोम धरणाच्या नियमित पाणी आवर्तनासाठी गेले सात महिने नऊ गावांचा संघर्ष सुरू आहे . २९ एप्रिल २०२४ रोजी कोरेगाव येथील तहसीलदार कार्यालयासमोर आम्ही उपोषण केले होते . मात्र राजकीय दबावातून कोरेगावचे आमदार महेश शिंदे धोम डाव्या कालव्याचे पाणी जाणीवपूर्वक बंद करत आहेत .धोम डावा कालवा उन्हाळी आवर्तन नियमित सुरू असताना दोन महिने पाणी आलेले नाही . आमदार शिंदे कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दमदाटी करत असल्याचा आरोप संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केला . या नऊ गावांमध्ये धोम डाव्या कालव्याला पाणी नसल्यामुळे शेतीच्या व पिण्याच्या पाण्याची अवस्था अत्यंत बिकट आहे . ही सर्व गावे कराड उत्तर मतदारसंघांमध्ये येत आहेत कराड उत्तर मतदार संघाच्या नऊ गावातील हक्काचे एक एटीएमसी पाणी हे जाणीवपूर्वक कोरेगाव मतदारसंघातील गावांसाठी पळवले जात आहे असाही आरोप करण्यात आला आहे .

आमच्या पाण्याच्या मागणीचा हा संवेदनशील प्रश्न प्रशासन व राजकीय पातळीवर अद्यापही प्रलंबित आहे . हा प्रश्न न सुटल्यास दिनांक सात मे रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेवर आम्ही बहिष्कार घालणार असल्याचा इशारा धोम संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आला आहे . या नऊ गावांमध्ये ३ज हजार मतदान आहे त्यामुळे पाणी सोडा आणि मत घ्या अशी थेट भूमिका संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली आहे . याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन केले आहे . आपल्या प्रश्नासंदर्भात संवेदनशीलपणे बैठक लावून त्या प्रश्नाचा निपटारा केला जाईल असे आश्वासन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहे

# महावितरणच्या प्रशिक्षण केंद्रांमध्ये 'पुणे परिमंडल' सलग दुसऱ्यांदा अव्वल

**राजदंड न्यूज नेटवर्क**



**पुणे :** महावितरणच्या राज्यभरातील २५ लघु प्रशिक्षण केंद्रांच्या सन २०२३-२४ च्या कार्य मूल्यमापनाचा अहवाल नुकताच जाहीर झाला. यात पुणे परिमंडलाच्या लघु प्रशिक्षण केंद्राने सलग दुसऱ्या वर्षी तब्बल १८४ टक्के उद्दिष्ट पूर्ण करीत अव्वल क्रमांक कायम ठेवला आहे. नागरिक, विद्यार्थी, विविध एजन्सीजचे कर्मचारी यांच्यासह महावितरणचे अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, कार्यशाळा, प्रबोधन व जनजागृतीसाठी पुणे परिमंडलाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

महावितरण अंतर्गत नाशिक येथील मुख्य प्रशिक्षण, संशोधन व सुरक्षा विभाग अंतर्गत राज्यात २५ ठिकाणी लघु प्रशिक्षण केंद्रे सुरू आहेत. या केंद्रांद्वारे अभियंता, अधिकारी तसेच नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांना विविध विषयांवर प्रशिक्षण देणे, कार्यशाळांचे आयोजन करणे तसेच नागरिकांना वीजसुरक्षेसह विविध योजनांबाबत प्रबोधन करण्यासाठी उपक्रमांचे आयोजन केले जाते.

पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान करण्यासाठी प्रशिक्षणाला मोठा वेग दिला आहे. त्यानुसार लघु प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष पाटणी यांनी गेल्या आर्थिक वर्षामध्ये तब्बल १४९ प्रशिक्षण वर्गांचे आयोजन केले. यामध्ये राज्यात सर्वाधिक ५३ हजार ७०० अभियंता, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, नागरिकांशी थेट संवाद साधून वीजसुरक्षेसह विविध विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले आहे. मुख्य प्रशिक्षण केंद्राने दिलेले उद्दिष्ट पुणे लघु प्रशिक्षण केंद्राने १८४ टक्के पूर्ण करीत राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. यासाठी मुख्य महाव्यवस्थापक दत्तात्रेय बनसोडे (नाशिक) यांचेही महत्त्वाचे सहकार्य मिळाले.

सन २०२३-२४ मध्ये पुणे परिमंडलातील ४ हजार ६१२ अभियंते, अधिकारी तसेच नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचारी तसेच मीटर रीडींग, सौर ऊर्जा एजन्सीजच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये विद्युत सुरक्षा, उपकेंद्र व वितरण यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती, ॲडव्हान्स मीटरींग इन्फ्रास्ट्रक्चर, सौर ऊर्जा, विद्युत वाहने, वीजचोरी रोखण्याच्या उपाययोजना, प्रथमोपचार, ताणतणाव व्यवस्थापन, वीजबिलांचे अचूक बिलींग आदींचा समावेश आहे. तसेच घरगुती व सार्वजनिक वीजसुरक्षा, डिजिटल ग्राहकसेवा, वीजबचत आदींबाबत शहरी व ग्रामीण भागात मेळावे, पथनाट्य, शाळा व महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षण वर्गांद्वारे नागरिक व विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. सोबतच महावितरण व पुण्यातील ३२ विद्युत अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यात ज्ञानाचे आदानप्रदान अंतर्गत सामंजस्य करार झाले आहेत. या विद्युत अभियांत्रिकीच्या ९ हजार ५०० विद्यार्थांशी थेट संवाद साधून वीजक्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान व घडामोडी, वीजसुरक्षा व डिजिटल ग्राहकसेवा आदींबाबत 'नॉलेज शेअरींग' करण्यात येत आहे.

राजेंद्र पवार, मुख्य अभियंता, पुणे परिमंडल - 'वीजग्राहकांना तत्पर सेवा देण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे, त्यांचे ज्ञान अद्ययावत करणे आवश्यक आहे. त्याचा पुणे परिमंडलातील लोकाभिमुख व गतिमान कामकाजासाठी फायदा होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गेल्या आर्थिक वर्षात प्रशिक्षणांचा वेग व विषयांची व्याप्ती वाढविण्यात आली'.

# भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनकडून पुण्यात ११ मे रोजी 'बहुरूपधारिणी' कार्यक्रम

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत ' बहुरूपधारिणी ' या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन दि.११ मे २०२४ रोजी करण्यात आले आहे.

मराठी भाषेचा प्रारंभापासून प्रवास या कार्यक्रमातून सादर केला जाणार आहे. निर्मिती, लेखन, निवेदन डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी यांचे आहे. संगीत संयोजन अनुप कुलथे यांचे असून गिरीश दातार, गौरी देशपांडे हे अभिवाचन करणार आहेत. मंजिरी जोशी, प्रणव कुलकर्णी हे गायन करणार आहेत. प्रकाश सुतार(कीबोर्ड), रोशन चांदगुडे(तबला), धनंजय साळुंखे(तालवाद्य) हे साथसंगत करणार आहेत.

हा कार्यक्रम शनिवार, दि.११ मे २०२४ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे होणार आहे.हा कार्यक्रम विनामूल्य आहे. भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २०५ वा कार्यक्रम आहे.

भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

# माफीचे साक्षीदार बनलेल्या अमित चक्रवर्तींना मुक्त करण्याचा दिल्ली हायकोर्टाचा आदेश

दिल्ली हायकोर्टानं न्यूजक्लिकचे एचआरप्रमुख अमित चक्रवर्ती यांच्या सुटकेचा आदेश दिला आहे. युएपीए प्रकरणात अमित चक्रवर्ती साक्षीदार बनले होते.

न्यूजक्लिक या न्यूज वेबसाईटवर चीनकडून पैसे घेऊन भारतात चीनच्या समर्थनातील प्रपोगंडा चालवण्याचा आरोप झाल्यानंतर युएपीए अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अमित चक्रवर्ती यांनी यूएपीए प्रकरणातून सुटकेसाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. जस्टिस स्वर्णकांता शर्मा यांच्या पीठानं ही याचिका मंजूर करत



अमित चक्रवर्ती यांच्या सुटकेचा आदेश दिला आहे.

अमित चक्रवर्ती यांच्यावर युएपीए अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. चीनमधील कंपन्यांकडून विदेशी पैसा घेऊन भारताला नुकसान पोहोचवल्याचा आरोप त्यांच्यावर होता.

चक्रवर्ती यांच्या वकिलानं ते या प्रकरणात माफीचे साक्षीदार बनल्यानं त्यांच्या सुटकेची मागणी केल होती. तर ईडीनंही त्यांना जामीन मिळण्याबाबत काही आक्षेप नसल्याचं म्हटलं होतं.

दिल्लीचे उपराज्यपाल व्हीके सक्सेना यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या छख-चौकशीची शिफारस केली आहे. खलिस्तान समर्थक संघटनांकडून निधी मिळाल्याच्या आरोपांप्रकरणी त्यांची चौकशी करण्याची शिफारस केली आहे.

राज्यपाल व्हीके सक्सेना यांनी गृह मंत्रालयाला त्यासंदर्भात पत्र लिहिले आहे. पत्रात त्यांनी १ एप्रिल २०२४ रोजी वर्ल्ड हिंदू फेडरेशन इंडियाचे राष्ट्रीय सरचिटणीस आशु मोंगिया यांच्याकडून आलेल्या तक्रारीचा उल्लेख केला आहे.

आम आदमी पार्टीचे कार्यकर्ते असलेले डॉ. मनीष कुमार रायजादा यांच्या 'एक्स' वरील पोस्टचा उल्लेखही केला आहे.

राज्यपालांच्या पत्रानुसार, तक्रारदाराने एका व्हिडिओचा संदर्भ दिला आहे. त्यामध्ये शीख फॉर जस्टीसचे नेते गुरपतवंत सिंग पन्नू दिसत असल्याचं म्हटलं आहे. शीख फॉर जस्टिस ही भारतातील प्रतिबंधित संघटना आहे. गुरपतवंत सिंग पन्नू यांनी शीखांसाठी वेगळ्या खलिस्तानची मागणी केली आहे.

# आरईसीला गुजरातमधल्या गिफ्ट सिटीमध्ये उपशाखा उघडण्यास रिझर्व बँकेची मंजुरी

**दिल्ली :** ऊर्जा मंत्रालयाच्या अंतर्गत महारत्न केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आणि आघाडीची बिगर बँकिंग वित्तीय कंपनी असलेल्या आरईसी लिमिटेड ला गुजरातमधील गांधीनगर येथील गुजरात इंटरनॅशनल फायनान्स टेक-सिटी (''गिफ्ट'') मध्ये आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्रात (आयएफएससी) स्वत:च्या मालकीची उपशाखा उघडण्यास भारतीय रिझर्व्ह बँकेकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' (दि. ३ मे २०२४) प्राप्त झाले आहे.

भारतातील वित्तीय सेवांसाठी वाढणाऱ्या केंद्रात, गिफ्ट सिटीत कार्य विस्तारण्याचा निर्णय हा आरईसी ने त्याच्या कार्यविभागात वैविध्य आणण्यासाठी आणि वाढीकरिता नवीन मार्गाचा धांडोळा घेण्यासाठी आहे. प्रस्तावित उपकंपनी गिफ्ट अंतर्गत वित्त कंपनी म्हणून कर्ज देणे, गुंतवणूक आणि इतर वित्तीय सेवांसह अनेक आर्थिक उपक्रमांमध्ये सहभागी असेल.

विकासावर बोलताना, आरईसी लिमिटेड चे मुख्य व्यवस्थापकीय संचालक विवेक कुमार देवांगन म्हणाले: ''गिफ्ट सिटी प्लॅटफॉर्म जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांसह आंतरराष्ट्रीय कर्ज उपक्रमांसाठी पोषक वातावरण प्रदान करतो. आम्हाला खात्री आहे की आरईसी याचा उपयोग जागतिक बाजारपेठेत स्वत:चे स्थान निर्माण करण्याकरिता करेल. गिफ्ट सिटी मधील कंपनी आरईसी साठी केवळ नवीन व्यवसाय संधीच देणार नाही तर देशाच्या उर्जा क्षेत्राच्या वाढीसाठी देखील महत्त्वपूर्ण योगदान देईल. जागतिक स्तरावर आमचा ठसा वाढवताना भारताच्या उर्जा आणि पायाभूत क्षेत्रातील वाढीला चालना देण्याच्या आरईसी च्या मिशनला पुढे नेण्यासाठी आम्ही या धोरणात्मक निर्णयाचा लाभ घेण्यास उत्सुक आहोत.

# जेट एअरवेजचे संस्थापक नरेश गोयल यांना २ महिन्यांचा अंतरिम जामीन मंजूर



मुंबई उच्च न्यायालयानं सोमवारी जेट एअरवेजचे संस्थापक नरेश गोयल यांना वैद्यकीय कारणानं दोन महिन्यांचा अंतरिम जामीन मंजूर केला आहे.

त्यांना मनी लाँडरिंगच्या एका प्रकरणात अंमलबजावणी संचलनालयानं सप्टेंबर २०२३ मध्ये अटक केली होती.

३ मे रोजी झालेल्या सुनावणीत हायकोर्टानं याबाबतचा निर्णय राखून ठेवला होता.

नरेश गोयल यांच्यावर कॅनडा बँकेबरोबर सुमारे ५०० कोटींच्कया फसवणुकीचा आरोप आहे.


# अमेठी आणि रायबरेली लोकसभा मतदारसंघासाठी काँग्रेसने नियुक्त केले निरीक्षक

उत्तर प्रदेशच्या अमेठी आणि रायबरेली लोकसभा मतदारसंघासाठी काँग्रेस पक्षानं निरीक्षकांची नियुक्ती केली आहे.

छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांना रायबरेली मतदारसंघाच्या तर राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांना अमेठी मतदारसंघाच्या निरीक्षकपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

रायबरेली लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी निवडणूक लढवत आहेत.

अमेठीमधून काँग्रेसनं गांधी कुटुंबाचे नीकटवर्तीय किशोरी



लाल शर्मा यांना उमेदवारी दिली आहे.

राहुल गांधी पहिल्यांदाच रायबरेलीमधून निवडणूक लढवत आहेत. १९९९ नंतर पहिल्यांदाच अमेठीमधून गांधी कुटुंबाचा सदस्य निवडणुकीच्या मैदानात उतरलेला नाही.

अशोक गेहलोत अमेठीचे निरीक्षक असतील.

## कुठेच न पोहोचणारा ११ बिलियन डॉलरचा पूल!

**नवी दिल्ली :** अमेरिकेतल्या कॅलिफोर्निया येथे एक चक्रावून टाकणारा प्रकार पुढे आला आहे. इथे सरकारने एक असा पूल बनवलाय ज्याचा रस्ता कुठेच जात नाही. या पुलासाठी तब्बल ११ बिलियन डॉलर खर्च आला आहे. शिवाय पूल बांधण्यासाठी ९ वर्षांचा वेळ खर्ची पडलाय. त्यामुळे हा पूल सध्या जागतिक पातळीवर चेष्टेचा विषय ठरला आहे.

या पुलावरुन अनेकांनी हायस्पीड रेल्वे अथॉरिटीचे कान पकडले आहेत. सदरील पूल सॅन फ्रान्सिस्कोला लॉस एन्जिलिसला जोडण्याच्या उद्देशाने आणि बुलेट ट्रेनचा एक भाग म्हणून उभारण्यात आलेला होता.

# केजमध्ये दोन कोटींचे चंदन जप्त, नगरसेवकासह तिघांवर गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर :** बीड जिल्ह्यातील केजजवळ रविवारी १ कोटी ९७ लाख ६८ हजार रुपयांचे बाराशे ३५.५ किलो ग्रॅम वजनाचे चंदन पकडण्यात आले. या कारवाईत एकूण २ कोटी १८ लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी बालाजी जाधव या नगरसेवकासह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती केजचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी दिली.

याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीनुसार चंदनाचा मालक बालासाहेब दत्तात्रय उर्फ बालाजी जाधव आहे. तर चालक प्रियतम काशिनाथ साखरे (३४, रा. अंबाजोगाई), शंकर पंढरी राख (रा. कौडगाव ता. केज) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी बालासाहेब जाधव यांच्या मालकीचे चोरीचे चंदन असून त्यांच्या सांगण्यावरून केजवरून धारूर मार्गे जालन्याकडे नेण्यात येत होती.

भाजीपाल्याच्या कॅरेटच्या आडून या चंदनाची तस्करी करण्यात येत असल्याचे पोलिसांनी सागितले.

# सुनीता विल्यम्स तिसऱ्यांदा अंतराळात झेपावणार

भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स तिसऱ्यांदा अंतराळात झेपावण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. केनेडी स्पेस सेंटरमधून उद्या (७ मे) रोजी भारतीय वेळेनुसार सकाळी ८ वाजता नव्या अवकाश यानातून त्या अवकाशाकडे झेपावणार आहेत. एनडीटीव्हीशी बातचीत करताना विल्यम्स यांनी सांगितले की, त्या धार्मिक असण्यापेक्षा आध्यात्मिक आहेत. उद्या बोईंग स्टारलाइन या नव्या अवकाश यानातून अंतराळात झेपावत असताना त्या स्वत:सह त्यांची लकी चार्म असलेली गणपतीची मूर्ती बरोबर नेणार आहेत.

सुनीत विल्यम्स म्हणाल्या की, उद्या अवकाशात उड्डाण घेत असताना मी माझ्यासह माझी आवडती गणपतीची मूर्ती नेत आहे. ही मूर्ती मला ऊर्जा देते. अंतराळात ही मूर्ती माझ्या बरोबर असताना मला आनंद वाटत असतो. सुनीता विल्यम्स



यांनी मागच्यावेळी स्वत:बरोबर भगवद्गीतेची प्रत नेली होती.

सुनीता विल्यम्स यांच्या नावावर आजवर अनेक विक्रमांची नोंद झालेली आहे. पृथ्वीभोवती सर्वाधिक काळ भ्रमण करणारी पहिली महिला बनण्याचा विक्रम अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांच्या नावावर आहे. तसेच अंतरालात मॅरेथॉन करण्याचाही विक्रम त्यांनी केला आहे. त्याशिवाय तब्बल ५० तास ४० मिनिटं अंतराळात पदयात्रा करण्याचाही विक्रम त्यांनी केलेला आहे. सुनीता विल्यम्स यांनी याआधी २००६ आणि २०१२ मध्ये अंतराळात उड्डाण घेतले होते. नासाच्या आकडेवारीनुसार त्यांनी अंतराळात एकूण ३२२ दिवस वास्तव्य केले आहे.



# अमित शाहांनी केला राम मंदिराचा उल्लेख

## म्हणाले-'ममता दीदींना त्यांच्या व्होट बँकेची भीती वाटते'

भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पश्चिम बंगालच्या पूर्व वर्धमानमध्ये निवडणुकीच्या प्रचारसभेत बोलताना ममता बॅनर्जींवर हल्लाबोल केला.

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी व्होट बँकेच्या भीतीनं अयोध्येतील रामललाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात सहभागी झाल्या नाही, असं शाह म्हणाले.

प्राण प्रतिष्ठा सोहळा झाला तेव्हा ममता दीदींना आमंत्रित करण्यात आलं होतं. त्यांच्या पुतण्यालाही पाठवलं होतं. पण ते लोक गेलेच नाहीत. ते का गेले नाहीत हे तुम्हाला माहिती आहे का? मी सांगतो. कारण ते त्यांच्या व्होट बँकेला घाबरतात. त्यांची व्होट बँक कोणती आहे, तुम्हाला माहिती आहे ना. हे जे घुसखोरी करण्यासाठी आले आहेत, ही त्यांची व्होटबँक आहे. ममता दीदी त्यांना घाबरतात, असं अमित शाह म्हणाले.

व्होट बँकेला घाबरून त्यांना रामावर बहिष्कार टाकला. दुर्गापूरमधील लोक आता त्यांना मतदान करू शकतात का? असंही त्यांनी म्हटलं.

# महाराष्ट्रातील चार भाविक पंजाबमध्ये भीषण रस्ते अपघातात ठार

महाराष्ट्रातील अमरावती येथील एक कुटुंब वैष्णोदेवी मंदिरातून परतत असताना पंजाबमधील जालंधर-पठाणकोट महामार्गावर झालेल्या चार जण ठार झाले.

पंजाबमधील जालंधर-पठाणकोट महामार्गावर सोमवारी झालेल्या भीषण अपघातात अमरावती येथील चार भाविक ठार झाल्याचे वृत्त आहे. यात ११ महिन्यांच्या मुलीचा समावेश आहे. जम्मूजवळील कटरा येथील वैष्णोदेवी मंदिरात दर्शन घेऊन हे कुटुंब परतत होते.

परतीच्या मार्गावर पंजाबमधील जालंधर जिल्ह्याच रायपूर-रोसूलपूर गावात पहाटे साडेपाचच्या सुमारास हा अपघात झाला.

या अपघाताबाबत अधिक माहिती देताना पंजाब पोलिस दलाचे अधिकारी केवल सिंह म्हणाले, 'ह्युंदाई आय १० या कारने हे सर्व भाविक प्रवास करत होते. प्रवासादरम्यान कार नियंत्रणाबाहेर गेली आणि ती समोरून येणाऱ्या टोयोटा इनोव्हा कारला जाऊन धडकली. त्यानंतर ही कार रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जाऊन आदळली. कारची धडक एवढी जोरदार होती की धडकेत कार पूर्णपणे चेंदामेंदा झाली.'

मृतांमध्ये गानू राम लाल (वय ५९), त्यांचा मुलगा लोकेश्वर (वय ३३), त्यांची पत्नी अनीषा (वय २६) आणि त्यांची ११ महिन्यांची मुलगी निहारिका यांचा समावेश आहे. स्थानिक रहिवाशांनी जखमींना रुग्णालयात दाखल केले. परंतु यातील चौघांना मृत घोषित करण्यात आले.

या अपघातात इनोव्हा कारमध्ये प्रवास करणारे दोघे जण गंभीर जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## त्र्यंबकमध्ये उटीची वारी सोहळा उत्साहात

**नाशिक :** त्र्यंबक नगरीत शनिवारी चैत्र महिन्यातील एकादशीनिमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून १५ हून अधिक दिंड्या दाखल झाल्या. दुपारी संत निवृत्तीनाथ समाधी तसेच विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तींना चंदनाची उटी लावण्यात आली. रात्री उशीराने ही उटी भाविकांना प्रसाद स्वरुपात देण्यात आली.

चैत्र महिन्यात उष्म्याचा असणारा कहर पाहता उटीच्या वारीला विशेष महत्व आहे. उटीवारीसाठी कडाक्याच्या उन्हात दिंड्या त्र्यंबकमध्ये दाखल झाल्या. मंदिर परिसर वारकऱ्यांनी गजबजला. दुपारी संत निवृत्तीनाथ समाधी तसेच विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीला चंदनाच्या उटीचा लेप लावण्यात आला. यावेळी भजन, हरिपाठ झाले. काल्याचे कीर्तन जयंत महाराज गोसावी यांनी केले.

काल्याच्या कीर्तनानंतर समाधीवरून उटी उतरविण्यात आली. उटी उतरल्यानंतर ती द्रवरुपात भाविकांना वाटण्यात आली. यासाठी २०० लिटरचे सात ते आठ पिंप देवस्थान परिसरात तयार ठेवण्यात आले होते.

# भारताबरोबरच आता परदेशातही धावणार Vande Bharat

देशभरातील अनेक राज्यात धावणारी वंदे भारत ट्रेन आता सिक्किममध्येही सुरू करण्याची तयारी सुरू केली आहे. तसे झाल्यास रेल्वेच्या क्षेत्रात मोठा क्रांतीकारी बदल होईल. सिक्किममध्ये वंदे भारत सुरु झाल्यास यामुळे ईशान्य भारतात कनेक्टिव्हिटी वाढवण्यास मदत होईल. यामुळे सेमी हाय-स्पीड ट्रेन सेवा सिक्किमला भारतीय रेल्वे नेटवर्कशी पुन्हा जोडली जाईल.

मागच्या वर्षी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटले होते की, डिसेंबर २०२४ पर्यंत सिक्किमला उर्वरित भारताशी जोडण्यासाठी सेमी-हाय-स्पीड वंदे भारत एक्सप्रेस चालवण्याची योजना आहे. सिक्किममध्ये आपल्या दौऱ्यावेळी वैष्णव यांनी ४५ किमी लांब सेवोके-रंगपो रेल्वे प्रकल्पाच्या कामाचे निरीक्षण केले आहे.

**केव्हापर्यंत सिक्किममध्ये धावणार वंदे भारत -**

वैष्णव यांनी म्हटले होते की,



सिक्किममधील वंदे भारत रेल्वे मार्गात १४ बोगदे वव १७ पूल असतील. सहा बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे व अन्य पुलांचे निर्माणकार्य सुरू आहे. पंतप्रधान सिक्किमला भारतीय रेल्वेच्या मानचित्रावर आणण्यासाठी इच्छुक आहेत. यावेळी रंगपो रेल्वेशी जोडला जाणार आहे. त्यानंतर रंगपो आणि गंगटोक दरम्यान रेल्वेचा विस्तार होणार आहे. डिसेंबर २०२४ पर्यंत वंदे भारत ट्रेन सिक्कमध्ये धावेल.

**वंदे भारतच्या माध्यमातून चीनला टेन्शन देण्याचे नियोजन -**

द टेलीग्राफच्या रिपोर्टमध्ये नॉर्थईस्ट फ्रंटियर रेल्वेच्या सूत्राच्या हवाल्याने म्हटले आहे की, केंद्र सरकार भारत-चीन सीमेवरील नाथू-ला पर्यंत रेल लिंक बनवणार आहे. सेवोके-रंगपो विभागात यावर्षी डिसेंबर महिन्यापर्यंत रेल्वे धावणार आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सिक्किम भौगोलिक दृष्ट्या महत्वपूर्ण आहे. त्यामुळे अरुणाचल प्रदेश आणि लडाखप्रमाणे या राज्यातील रेल्वे कनेक्टिविटी सुधारण्यावर सरकारचा भर आहे. एका अन्य रिपोर्टमध्ये दावा केला आहे की, जर सिक्किममध्ये वंदे भारत ट्रेन सुरू झाली तर ५ तासात गुवाहाटीला पोहोचणे शक्य आहे. जे येथील लोकांसाठी गेम-चेंजर ठरेल.

**मुंबई -अहमदाबाद ट्रेनचे स्पीड वाढणार -**

मुंबई आणि अहमदाबाद दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी मोठी खुशखबर आहे. पश्चिम रेल्वेच्या या मार्गावर वेगवान वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनचे **(Vande bharat express train)** ट्रायल केले जात आहे. यासाठी रेल्वे सुरक्षा आयुक्त **(CRS)** कडून हिरवा झेंडा दाखवला आहे. वंदे भारत ट्रेन्स आपली गती व चांगल्या सुविधांसाठी ओळखली जाते. सध्या या ट्रेनची गती १३० किमी प्रति तास आहे, ती वाढवून १६० किलोमीटर प्रति तास करण्याची तयारी आहे. जर ही ट्रायल यशस्वी झाली तर प्रवाशांचा वेळ वाचणार आहे. मुंबई आणि अहमदाबाद मार्गावरील प्रवासात जवळपास ४५ मिनिटांची बचत होणार आहे. सध्या हे अंतर पार करण्यासाठी जवळपास ५ तास २५ मिनिटांचा वेळ लागतो.

# खांद्यावर हात ठेवल्याने डीके शिवकुमार संतापले, सगळ्यांसमोर कार्यकर्त्याच्या कानशिलात लगावली

कर्नाटकात निवडणुकीच्या प्रचारादरम्यान उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी खांद्यावर हात ठेवणाऱ्या कार्यकर्त्याच्या कानशिलात लगावली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून विरोधकही शिवकुमार यांच्या वागणुकीकडे बोट दाखवत आहेत. कर्नाटकात डीके शिवकुमार हे 'डीके' म्हणून प्रसिद्ध आहेत. शिवकुमार हे शनिवारी हावेरी येथील सावनूर येथे पक्षाच्या प्रचारासाठी गेले. शिवकुमार एसयूव्हीतून बाहेर येताच एका कार्यकत्याने त्यांच्या खांद्यावर हात ठेवला. यामुळे शिवकुमार संतापले आणि त्यांनी संबंधित कार्यकर्त्याच्या कानशिलात लगावली.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये मनपा सदस्य अलाउद्दीन मणियार यांनी काँग्रेस नेते शिवकुमार यांच्या खांद्यावर हात ठेवल्याचे दिसत आहे. मात्र, ही गोष्ट शिवकुमार यांना खटकली. त्यांनी कोणताही विचार न करता कार्यकर्त्यांसमोर मणियार यांच्या कानशिलात लगावली. विचित्र गोष्ट म्हणजे, या घटनेनंतरही मणियार हासताना दिसत आहेत. मणियार यांना सुरक्षा कर्मचारी आणि शिवकुमार यांच्या समर्थकांनी ढकलून दिले.

६१ वर्षीय काँग्रेस नेते शिवकुमार स्पष्टपणे नाराज दिसत होते. त्यांनी मणियार यांना तिथून दूर जाण्याचा इशारा केला. त्याला मागे ढकलण्यात आले. यानंतर तो इतर समर्थकांमध्ये सामील झाला. नंतर शिवकुमार पुढे निघून गेले. शिवकुमार हे पक्षाच्या उमेदवार विनोदा आसुती यांच्या प्रचारासाठी हावेरी येथे पोहोचले होते. त्यावेळी हा प्रकार घडला.

कर्नाटकात लोकसभेच्या २८ जागा असून राज्यात दोन टप्प्यात निवडणुका होत आहेत. १४ जागांसाठी २६ एप्रिल रोजी मतदान झाले असून उर्वरित १४ जागांसाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे. तर, ४ जून २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने २८ पैकी २५ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेस आणि जेडीएस या राज्यातील तत्कालीन आघाडीतील भागीदारांना प्रत्येकी एकच जागा जिंकता आली. यावेळी भाजप आणि जेडीएसमध्ये युती आहे. भाजप २५ जागांवर तर जेडीएस तीन जागांवर निवडणूक लढवत आहे.

जेडीएस प्रमुख एचडी देवेगौडा यांचा नातू प्रज्वल रेवन्ना यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप आहेत, त्याचे परिणाम पक्षाला भोगावे लागत आहेत. सर्वसामान्यांच्या संतापाच्या पार्श्वभूमीवर परदेशात असलेल्या रेवन्ना यांना पक्षाने निलंबित केले. प्रज्वल रेवन्ना यांचे काका एचडी कुमारस्वामी यांनी डीके शिवकुमारवर व्हिडिओ सार्वजनिकपणे प्रसारित करण्याचा कट रचल्याचा आणि त्यानंतर या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन केल्याचा आरोप केला.